खे. ता. शि. प्र. मंडळाचे

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

भूगोल विभाग

गावसर्वेक्षण अहवाल

मौजे बुरसेवाडी

ता. खेड, जि. पुणे

सर्वेक्षक

एस. वाय. बी. ए. विद्यार्थी

मार्गदर्शक

प्रा. डॉ. दिलीप मुळूक

प्रा. डॉ. डी. एम. मारकड

प्रा. एम. एल. मुळूक

२०२५ - २६

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, राजगुरूनगर

ता. खेड (राजगुरुनगर), जि. पुणे

भूगोल विभाग

सन २०१६ – २०१७

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कु./कुमारी

रोलनंबर--------परीक्षा क्रमांक------ह्याने /हिने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात भूगोल या विषया अंतर्गत ग्रामसर्वेक्षण अहवाल मौजे बुरसेवाडी ता. खेड (राजगुरुनगर), जि. पुणे मध्ये सहभागी होऊन ग्रामसर्वेक्षणाचे प्रात्यक्षिक काम समाधानपूर्वक पूर्ण केले आहे.

(विषय शिक्षक)

प्रा. डॉ.दिलीप मुळूक
(भूगोल विभाग प्रमुख)

ऋणनिर्देश

पुणे विद्यापीठाच्या कलाशाखे अंतर्गत विशेष स्तरावर भूगोल या विषया अंतर्गत प्रात्यक्षिक कामकाज तयार करणे अनिवार्य आहे.

शैक्षणिक वर्ष भूगोल या विभागातील सन २०२५–२६ या कालावधीत भूगोल विषयावर प्रात्यक्षिक कार्यावर वृत्तांत तयार करणे यामध्ये ग्रामसर्वेक्षण हा विषय निवडला असून मौजे बुरसेवाडी, ता. खेड (राजगुरुनगर), जि. पुणे या ठिकाणी जावून भेट दिली. यावरून निरिक्षण करून हा ग्रामसर्वेक्षण वृत्तांत तयार केला आहे.

प्राचार्य. डॉ. शिरीष पिंगळे आणि उपप्राचार्य प्रा. डॉ. संजय शिंदे यांनी आम्हाला ग्रामसर्वेक्षणास जाण्यास परवानगी दिली. तसेच आम्हाला ग्रामसर्वेक्षणास जाण्यास प्रोत्साहित केले त्याबद्दल आम्ही सर्व त्यांचे आभारी आहोत.

हा ग्रामसर्वेक्षण वृत्तांत तयार करण्यासाठी भूगोल विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. दिलीप मुळूक, आणि आमचे मार्गदर्शक डॉ. डी. एम. मारकड, आणि प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी आम्हाला मार्गदर्शन केले. तसेच सर्वेक्षण करताना आमच्याबरोबर राहून सहकार्य केले त्याबद्दल आम्ही सर्व त्यांचे आभारी आहोत. तसेच हा ग्रामसर्वेक्षण वृत्तांत तयार करण्यासाठी ग्रंथालय प्रमुख प्रा. तापकिर मॅडम व त्यांचे सहकारी यांनी वृत्तांत संदर्भातील पुस्तके उपलब्ध करून दिली त्याबद्दल आम्ही सर्व त्यांचे आभारी आहोत. तसेच त्या गावचे सरपंच उपसरपंच व गावातील नागरीक यांनी मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल आम्ही सर्वांचे मनापासून आभारी आहोत.

त्याचप्रमाणे माझया सर्व मित्रमैत्रिणींनी मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

भूगोल विभागाचे शतश: आम्ही सर्वजण आभारी आहोत.

———————————————————

विद्यार्थ्याचे नाव व सही

अनुक्रमणिका

प्रकरणक्रमांक	प्रकरणाचेनाव	पाननं
	प्रमाणपत्र	
	ऋणनिर्देष	
	तक्ता विवेचन	
	आलेख विवेचन	
	नकशा यादी	
	छायाचित्रांची यादी	
प्रकरण पहिले–ग्रामसर्वेक्षण स्वरूप, व्याप्ती व महत्त्व		
1.1	प्रस्तावना	1
1.2	सर्वेक्षणाचे स्वरूप	1
1.3	सर्वेक्षणाचे महत्त्व	2
1.4	सर्वेक्षणाच्या अभ्यासपध्दती	2
1.5	सर्वेक्षणाची व्याप्ती	4
प्रकरण दुसरे–गुंडाळवाडी ग्राम– क्षेत्र अभ्यास		
2.1	बुरसेवाडी गावचा इतिहास	5
2.2	बुरसेवाडी गावची सर्वसाधारण माहिती	5
2.3	भौगोलिक स्थान	7
2.4	स्थान –सापेक्ष निरपेक्ष	7
2.5	बुरसेवाडीचे वस्तीस्थान	7
प्रकरण तिसरे – प्राकृतिक रचना		
3.1	बुरसेवाडी – भूपृष्ठरचना	09
3.2	बुरसेवाडी – जलप्रणाली	12
3.3	बुरसेवाडी – मृदा	13
3.4	बुरसेवाडी – हवामान	14
3.5	गुंडाळवाडी – वनस्पती	15
3.6	बुरसेवाडी – प्राणी	16
3.7	बुरसेवाडी – वाहतूक आणि दळणवळण	16
प्रकरण चौथे – सामाजिक घटक		
4.1	बुरसेवाडी – लोकसंख्या	18
4.2	बुरसेवाडी – धर्मनिहाय वितरण	18
4.3	बुरसेवाडी – लिंग गुणोत्तर	19
4.4	बुरसेवाडी – वयोगट रचना	19
4.5	बुरसेवाडी – वैवाहिक स्थिती	20
4.6	बुरसेवाडी – शिक्षण	21
4.7	बुरसेवाडी – स्थलांतर	22

प्रकरण पाचवे – आर्थिक घटक		
5.1	बुरसेवाडी – व्यावसायिक रचना	**23**
5.2	बुरसेवाडी – नोकरी	**24**
5.3	बुरसेवाडी – प्रमुख धान्य पिके	**24**
5.4	बुरसेवाडी – प्रमुख बागायती पिके	**25**
5.5	बुरसेवाडी – जलसिंचनाच्या सोयी	**25**
5.6	बुरसेवाडी – जमिनीचे प्रमाण	**26**
5.7	बुरसेवाडी – वार्षिक उत्पन्न	**27**
5.8	बुरसेवाडी – पशूपालन	**28**
5.9	बुरसेवाडी – लोकवस्ती	**29**
5.10	बुरसेवाडी – घरांची रचना	**29**
5.11	बुरसेवाडी – भिंतींचे प्रकार	**29**
5.12	बुरसेवाडी – घरांच्या छप्पराचा प्रकार	**30**
5.13	बुरसेवाडी – आहार	**30**
5.14	बुरसेवाडी – राहणीमानाचा दर्जा	**31**
5.15	बुरसेवाडी – घरगुती वापरातील वस्तु	**32**
5.16	बुरसेवाडी –इंधन	**32**
5.17	बुरसेवाडी – वाहने	**33**
प्रकरण सहावे – सांस्कृतिक घटक		
6.1	बुरसेवाडी – सण व समारंभ	**34**
6.2	बुरसेवाडी – चालीरीती	**34**
6.3	बुरसेवाडी – गावची यात्रा	**35**
6.4	बुरसेवाडी – विवाहपध्दती	**35**
6.5	बुरसेवाडी – पोषाख/वेशभूषा	**35**
प्रकरण सातवे – ज्ञविविध सुविधा, समस्या व उपाययोजना		
7.1	बुरसेवाडी – वहतूक आणि दळणवळण	**37**
7.2	बुरसेवाडी – पाणी पुरवठा	**37**
7.3	बुरसेवाडी – वीज	**38**
7.4	बुरसेवाडी – आरोग्य	**38**
7.5	बुरसेवाडी – शौचालये	**38**
7.6	बुरसेवाडी – शैक्षणिक सुविधा	**38**
अ)	बुरसेवाडी – निष्कर्ष	**39**
ब)	बुरसेवाडी – समस्या	**39**
ड)	संदर्भ	**39**
इ)	बुरसेवाडी – छायाचित्रे	**40**

तक्ताविवेचन

अ.नं.	तक्ता	पाननं.
1	बुरसेवाडी गावचे धर्मनिहाय वितरण	18
2	बुरसेवाडी गावचे लिंगनिहाय लोकसंख्येचे शेकडा प्रमाण	19
3	बुरसेवाडी गावचे वयोगटानुसार लोकसंख्येचे विभाजन शेकडा प्रमाण	20
4	बुरसेवाडी गावचे वैवाहिक स्थिती शेकडा प्रमाण	21
5	बुरसेवाडी गावचे शैक्षणिक स्थिती शेकडा प्रमाण	21
6	बुरसेवाडी गावचे व्यावसायिक रचना शेकडा प्रमाण	23
7	बुरसेवाडी गावचे कडध्यान्य व धान्य पिकांचा प्रकार	24
8	बुरसेवाडी गावचे अन्नधान्य बागायती पिकांचा प्रकार	25
9	बुरसेवाडी गावचे जलसिंचनाच्या सुविधा शेकडा प्रमाण	25
10	बुरसेवाडी गावातील जमिनीचा प्रकार शेकडा प्रमाण	26
11	बुरसेवाडी गावातील कुटूंबनिहाय वार्षिक उत्पन्न	27
12	बुरसेवाडी गावचे पशूपालन शेकडा प्रमाण	28
13	बुरसेवाडी गावातील घराच्या भिंतीचा प्रकार शेकडा प्रमाण	30
14	बुरसेवाडी गावातील घरांच्या छपराचा प्रकार शेकडा प्रमाण	30
15	बुरसेवाडी – लोकांच्या आहारातील घटक पदार्थ शेकडा प्रमाण	31
16	बुरसेवाडी गावातील दैनिक वापरातील वस्तूंचे प्रमाण	32
17	बुरसेवाडी गावातील वाहनांची संख्या	33
18	बुरसेवाडी गावातील वेशभूषा शेकडा प्रमाण	35

आलेख विवेचन

अ.नं.	तक्ता	पाननं.
1	बुरसेवाडी गावचे धर्मनिहाय वितरण	18
2	बुरसेवाडी गावचे स्त्री–पुरूष शेकडा प्रमाण	19
3	बुरसेवाडी गावचे वयोगटानुसार लोकसंख्येचे विभाजन शेकडा प्रमाण	20
4	बुरसेवाडी – वैवाहिकस्थिती शेकडा प्रमाण	21
5	बुरसेवाडी गावची शैक्षणिक स्थिती शेकडा प्रमाण	22
6	बुरसेवाडी – व्यावसायिक रचना शेकडा प्रमाण	23
7	बुरसेवाडी गावातील कडध्यान्य व धान्य पिकांचा प्रकार	24
8	बुरसेवाडी – जलसिंचनाच्या सुविधा शेकडा प्रमाण	26
9	बुरसेवाडी गावातील जमिनीचा प्रकार शेकडा प्रमाण	26
10	बुरसेवाडी गावातील वार्षिक उत्पन्न शेकडा प्रमाण	27
11	बुरसेवाडी – पशूपाल शेकडा प्रमाण	28

नकाशा यादी

अ.नं.	तक्ता	पाननं.
1.	बुरसेवाडी स्थानदर्शक नकाशा	06
2.	बुरसेवाडी गाववस्ती दर्शक नकाशा	08
3.	बुरसेवाडी गावचा स्थलनामदर्शक नकाशा	08
4.	बुरसेवाडी भूउठावदर्शक नकाशा	10
5.	बुरसेवाडी समोच्चरेषा दर्शक नकाशा	11
6.	बुरसेवाडी भूपृष्ठाचा उतारदर्शक नकाशा	11
7.	बुरसेवाडी जलप्रणालीदर्शक नकाशा	13
8.	बुरसेवाडी गाव — रस्ते दर्शक नकाशा	16
9.	बुरसेवाडी भूवक्रतादर्शक नकाशा	16

छायाचित्र यादी

अ.नं.	तक्ता	पान नं.
१	बुरसेवाडी विहगंम दृश्य	४१
२	बुरसेवाडी शंभूच्या टेकडीवरील मंदीराचे प्रवेद्वार	४१
३	बुरसेवाडी — गाळपेर जमिन व धरण जलाशय	४१
४	बुरसेवाडी येथील डोंगरवस्तीकडे जाणारा रस्ता	४२
५	बुरसेवाडी — ठाकर अदिवासी कन्या शेळी पालन	४२
६	बुरसेवाडी — कच्च्या विटा तयार करताना अदिवासी तरूण	४२
७	बुरसेवाडी — पारंपारीक जळण गोवऱ्या	४३
८	बुरसेवाडी — बागायती शेती कांदा पीक	४३
९	बुरसेवाडी — चास कमान धरणाचा जलाशय	४३
१०	बुरसेवाडी — डोंगरउतारावरील वनव्यवस्थापन	४४
११	बुरसेवाडी — घरे	४४
१२	बुरसेवाडी – जिरायती क्षेत्र असलेली जमिन	४४
१३	बुरसेवाडी — पाणंद रस्ता	४५
१४	बुरसेवाडी — अदिवासी ठाकर समाजाची वस्ती	४५
१५	बुरसेवाडी — जुन्या पध्दतीचे बांधकाम असलेली घरे	४५
१६	बुरसेवाडी – पारंपारीक पध्दतीने जनावरांचे व्यवस्थापन	४६
१७	बुरसेवाडी – बागायती क्षेत्र समिंश्र पिके	४६
१८	गावसर्वेक्षणात सहभागी विद्यार्थी प्रा. डी. एम. मारकड यांचेसोबत	४६

प्रकरण पहिले

ग्राम सर्वेक्षण स्वरूप

१.१ प्रस्तावना —

भूगोल विषयाद्वारे आपण अनेकविध घटकांचा अभ्यास करतो. त्यामध्ये प्राकृतिक घटकांचा अभ्यास प्रामुख्याने केला जातो. परंतु बदलत्या काळानुसार भूगोलाच्या शाखांचा विस्तार झाला. त्यामुळे मानवाच्या सामाजिक व सांस्कृतिक घटकांचा अभ्यास करणे हे त्यामध्ये साहजिकच अंतर्भूत झाले. आज इंटरनेटच्या षोधामुळे माहितीचा विस्फोट झाला आहे. एखादी माहिती आपल्याला हवी असेल तर एका क्षणात एका बटणावर सहज उपलब्ध होत आहे. इंटरनेटबरोबरच माहिती मिळविण्याचे आणखी काही स्त्रोत उपलब्ध आहेत. त्यामध्ये पुस्तके, नकाशे, विविध टी.व्ही. चॅनेल इ. परंतु या सर्वांद्वारे मिळालेली माहिती ही अप्रत्यक्षपणे आपल्याला मिळते. आपण स्वत: त्यासाठी काहीही केलेले नसते. जेव्हा आपण एखाद्या ठिकाणी जावून प्रत्यक्ष माहिती मिळवतो, निरिक्षणे करतो, व मिळालेल्या माहितीवरून निष्कर्ष काढतो तेव्हा त्यास क्षेत्रअभ्यास असे म्हणतात.

कोणत्याही घटकाच्या स्थानीय वितरणाच्या अभ्यासाला महत्व असते. भारतात सुमारे सहा लाख खेडी आहेत. या खेड्यांमध्ये अनेक घटकांच्या बाबतीत अनेक प्रकारच्या खेडी स्वयंपूर्ण होती. खेडे हे देशाचेच एक छोटे एकक असल्याने खेड्याचा अभ्यास म्हणजेच पर्यायाने देशाचा अभ्यास ठरतो. त्यामुळे खेडयाचा अभ्यास करणे भूगोल अभ्यासकाला महत्वाचे आहे.आपल्या राहत्या ठिकाणापासून जवळच्याच परिसरातील एखाद्या गावास भेट देवून तेथील प्राकृतिक, सांस्कृतिक घटकांचे निरीक्षण करून सर्वेक्षणाद्वारे माहिती संकलित करणे व संकलित केलेल्या माहितीच्या आधारे त्या गावाचा अहवाल तयार करणे हे ग्राम सर्वेक्षणामध्ये अपेक्षित आहे.

भूगोल विषयाचे अध्ययन करणा—या विद्यार्थ्यांना ग्रामसर्वेक्षणाचा अनुभव प्रात्यक्षिकाच्या निमित्ताने येत असतो व या प्रकारचा अनुभव येणे हे अतिषय महत्वाचे असते.

१.२ सर्वेक्षणाचे स्वरूप—

२०२५—२६ च्या भूगोल विभागाच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमात असलेल्या ग्रामसर्वेक्षणासाठी महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील बुरसेवाडी हे गाव निवडलेले आहे. या गावाचे स्थान, प्राकृतिक रचना, पर्वत, पठारे, जलप्रणाली,

वनस्पती, प्राणी, खडक, खनिजे, लोकसंख्या, वसाहती, व्यवसाय, राहणीमान, या घटकांचा येथे अभ्यास करावयाचा आहे. हा अभ्यास विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाच्या दृष्टीनेही महत्वाचा आहे

सर्वेक्षणाच्या अभ्यासपद्धती — या गावसर्वेक्षणा मध्ये सुमारे १३६ प्रश्नावली गावातील कुटुंबांकडून भरून घेण्यात आल्या. या प्रश्नावलींच्या आधारे तसेच पुस्तके आणि इतर संदर्भ साहित्याच्या आधारे प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला.

१.३ सर्वेक्षणाचे महत्त्व

ग्राम सर्वेक्षणामुळे त्या क्षेत्रातील प्राकृतिक व सांस्कृतिक घटकांशी असलेला संबंध लक्षात येतो. त्यांचे स्पष्टीकरण करणे सुलभ जाते. सर्वेक्षण ही भौगोलिक अभ्यासाची महत्त्वाची पध्दती आहे. क्षेत्राचे अर्थपूर्ण आकलन होण्यासाठी सर्वेक्षण करून क्षेत्र अभ्यास उपयुक्त ठरतो. आपण भौगोलिक घटकांचे निरीक्षण करतो तेथील वस्तुस्थिती जाणून घेतो. तेथील माहिती संकलित करतो, अशा संकलित केलेल्या माहितीचे पृथक्करण कसे करावे याचे कौशल्य आपणास सर्वेक्षणामुळे प्राप्त होते. तो प्रदेश किंवा ते गाव भोवतालच्या प्रदेशापेक्षा कसा भिन्न आहे हे ओळखता येते. सर्वेक्षणामुळे वेगवेगळया प्रदेशातील पर्यावरणाची तुलना करण्याचे कौशल्य मिळते. त्याचप्रमाणे आम्ही केलेल्या बुरसेवाडी गावाच्या सर्वेक्षणामुळे आम्हाला तेथील विविध भौगोलिक घटकांची माहिती मिळाली व त्याचे महत्त्व आम्हाला समजले.

भूगोल विषयामध्ये गाव सर्वेक्षणाचे महत्व अनन्य साधारण आहे. गाव हा स्वतंत्र स्वयंभू प्रदेश असतो. गाव स्वयंपूर्ण घटक असतो. गाव हा छोट्या स्वरूपाचा देशच असतो. तो देशाचे प्रतिबिंब दाखविणारा अंश असतो. गावाच्या अभ्यासाने देशाविषयी काही अनुमान करता येते. गाव सर्वेक्षणाने गावाविशयी शास्त्रशुद्ध माहिती मिळते. गावाची प्राकृतिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्थिती, विकास यांचा आलेख समजतो. तसेच गावातील समस्या लक्षात येवून त्या समस्या सोडविण्याचा मार्ग सापडतो. गावाच्या विकासावरच देशाचा विकास अवलंबून आहे. यामुळे भूगोलाच्या अभ्यासात गाव सर्वेक्षणाला महत्व आहे.

१.४ सर्वेक्षणाच्या अभ्यासपध्दती

भूगोल विषयामध्ये विविध प्रकारची भौगोलिक माहिती मिळविण्यासाठी अनुरूप अशा साधनसामग्रीची आवश्यकता असते. भूगोलातील सामग्री ही वैशिष्टपूर्ण असून ती मुख्यत्वे दोन प्रकारात विभागली जाते.

१. प्राथमिक स्वरूपाची सामग्री

२. द्वितीय स्वरूपाची सामग्री

१. प्राथमिक स्वरूपाची सामग्री

प्राथमिक स्वरूपाची सामग्री मिळविण्यामध्ये अभ्यासकर्त्याची भूमिका महत्वाची असते. ही सामग्री प्राप्त करण्यासाठी काही पध्दती आहेत

- **निरीक्षण पध्दती, क्षेत्र अभ्यास पध्दती, मुलाखत पध्दती**

यांतील क्षेत्र अभ्यास पध्दतीमध्ये कोणत्या प्रकारची सामग्री मिळवावयाची आहे त्यानुसार साधनांचा वापर केला जातो. यात प्रामुख्याने सर्वेक्षण प्रश्नावलीचा वापर मोठया प्रमाणावर केला जातो. उदा. ग्रामीण व शहरी भागाविषयी भौगोलिक दृष्टया सर्वेक्षण करावयाचे असल्यास शहरी व ग्रामीण भागासाठी वेगवेगळया प्रकारची सर्वेक्षण प्रश्नावली तयार करावी लागते. याशिवाय कोणत्या प्रकारची माहिती मिळवावयाची आहे, त्यानुसार प्रश्नाची रचना किंवा आखणी करावी लागते. या व्यतिरीक्त निरीक्षण आणि मुलाखत तंत्राचाही उपयोग करावा लागतो. यानंतर अभिप्रेत असलेल्या निकषांनुसार सामग्रीचे वर्गीकरण व विश्लेषण करणे आवश्यक असते. तसेच प्रदेशाचा नकाशा तयार करणे गरजेचे असते. याचाच अर्थ भूगोलामध्ये एखादया प्रदेशाची भौगोलिकदृष्टया माहिती मिळवावयाची असल्यास सर्वेक्षण ही पध्दती महत्त्वपूर्ण असून यामध्ये निरीक्षण, लेखन, चित्रीकरण, वर्गीकरण, आलेखन या बाबींचाही समावेश होतो.

२. द्वितीय स्वरूपाची सामग्री

ज्या वेळेस अभ्यासक सामग्री स्वत: क्षेत्रात जाऊन प्राप्त करत नाही म्हणजेच सामग्री वेगवेगळया पध्दतीने मिळविली जाते, अशा सामग्रीस द्वितीय स्वरूपाची सामग्री असे म्हणतात.

द्वितीय स्वरूपाची सामग्री मिळविण्याचे स्त्रोत –

- प्राथमिक स्त्रोताद्वारे प्राप्त केलेली सामग्री पृथकरण करून तयार केलेल विविध प्रबंध आणि संशोधनपर लेख
- वर्तमानपत्रे, संशोधन अहवाल.
- विविध संदर्भ पुस्तके

सर्वेक्षण करीत असताना प्रामुख्याने प्राथमिक स्वरूपाची सामग्री मिळविण्याचे स्त्रोत वापरण्यात आले. तसेच सर्वेक्षण अहवाल तयार करत असताना दोन्ही स्वरूपाच्या सामग्रीचा वापर करण्यात आला.

अभ्यासासाठी वापरलेल्या अभ्यासपध्दती –

१. या अभ्यासासाठी बुरसेवाडी गावास प्रत्यक्ष भेट देवून निरीक्षण केले.

२. प्रश्नावली तयार करून त्या ग्रामस्थांकडून भरून घेतल्या.

३. नमुना सर्वेक्षणासाठी ४० टक्के नमुन्यांची निवड केली.

४. भारतीय स्थलनिर्देशक नकाशांच्या साहाय्याने भूरचनेचा अभ्यास केला.

५. विविध सांख्यकीय आकृत्यांच्या सहाय्याने आकडेवारीचे विश्लेषण केले.

६. नकाशा निर्मितीसाठी जीआएस, गुगल अर्थ, या तंत्राचा प्रभावीपणे उपयोग करण्यात आला

१.५ सर्वेक्षणाची व्याप्ती –

गाव सर्वेक्षणात कोणकोणत्या विषयांचा अभ्यास केला जातो? याचा विस्तार काय आहे याची पहाणी करणे म्हणजे गाव सर्वेक्षणाची व्याप्ती. गाव सर्वेक्षणाध्ये गावाची सर्वसाधारण माहिती, गावाचे निरपेक्ष आणि सापेक्ष स्थान, गावाची भूरचना, जलप्रणाली, हवामान, मृदा, गावाची लोकसंख्या, साक्षरता, वैवाहिक स्थिती, शैक्षणिक स्थिती, गावातील आर्थिक व्यवसाय, उत्पन्न, सामाजिक स्थिती, सांस्कृतिक वैशिष्ट्ये यांचा गाव सर्वेक्षणात अभ्यास केला जातो.

———————————————————————

प्रकरण दुसरे

मौजे बुरसेवाडी — ग्राम क्षेत्रअभ्यास

२.१ बुरसेवाडी गावाचा इतिहास —

हे गाव मध्ययुगीन काळापासून अस्तित्वात आहे. हे गाव पूर्वी बिबी या गावाची एक वस्ती होती. नंतर १९८४ साली बिबी हे गाव चासकमान धरणात बुडाले. बिबी हे गाव विस्थापित झाले. बिबी गावचे काही नागरिक बुरसेवाडी व काही नागरिक गुंडाळवाडी येथे स्थायिक झाले.

२.२ बुरसेवाडी गावाची सर्वसाधारण माहिती

महाराष्ट्रातील दख्खनच्या पठारावर सहयाद्रीच्या कुशीत असलेला पुणे जिल्हा हा विविध वैशिष्टयांनी समृध्द आहे. पुणे जिल्हयाला ज्याप्रमाणे ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे, त्याचप्रकारचा संपन्न भौगालिक वारसाही लाभलेला आहे. महाराष्ट्रातील जैवविविधता संपन्न असलेली अनेक ठिकाणे आहेत, त्यापैकीच एक ठिकाण म्हणजे पुणे जिल्हयातील उत्तर दिशास्थित खेड तालुका होय. या तालुक्यात एकूण १९२ गावे आहेत. बुरसेवाडी हे त्यापैकीच एक ऐतिहासिक वारसा लाभलेले गाव होय. हे गाव तालुक्याच्या पश्चिमेकडील भागात वसलेले आहे.

राजगुरूनगरच्या आग्नेयेस २२ किमी अंतरावर बुरसेवाडी हे गाव वसले आहे. राजगुरूनगरवरून चास मार्गे वाड्याला एक मार्ग जातो. या मार्गावर राजगुरूनगरपासून २२ कि.मी अंतरावर बुरसेवाडी या गावातून एक मार्ग वाड्यास जातो. उत्तरेस ढाकाळे, , दक्षिणेस कहू कोयाळी पूर्वेस कडधे आणि पश्चिमेस गुंडाळवाडी ही गावे आहेत. बुरसेवाडी भिमा नदीच्या खोऱ्यात वसलेले टुमदार गाव आहे.

गावाच्या उत्तरेस टेकाडी, घोडमाळ, भोरझुरी नावाचे डोंगर आहेत. संपूर्ण गाव हे एका टेकडीच्या पायथ्याशी वसलेले आहे.

गावठाणाबरोबरच आसपासच्या विविध वाड्यंवस्त्यांवर लोकवस्ती विखुरलेली दिसून येते. त्यामध्ये रोडे मळा, चंद्रावळी मळा, तोरण झुरा, इचकेमळा, घिगेदरा, ठाकरवाडी, मुकेवस्ती, तनपुरे वस्ती, मागचा दरा, सादडबन, टेकाडी इ. विविध नावे असलेली ही ठिकाणे आहेत.

२.३ भौगोलिक स्थान —

भौगोलिकदृष्ट्य कोणत्याही स्थळाचे स्थान दोनप्रकारे सांगता येते. एक निरपेक्ष स्थान, व दुसरे सापेक्ष स्थान. निरपेक्ष स्थान हे अक्षवृत्ते व रेखावृत्ते यांच्या संदर्भात सांगितले जाते तर सापेक्ष स्थान हे आजूबाजूच्या भौगोलिक स्थितीच्या संदर्भात सांगितले जाते.

बुरसेवाडी हे गाव पुणे जिल्ह्यतील खेड तालुक्यात आहे. पुणे जिल्हा हा पश्चिम महाराष्ट्रातील मध्यवर्ती ठिकाणी असलेला महत्वाचा जिल्हा आहे. खेड तालुका उत्तर पुणे जिल्ह्यातील एक तालुका आहे. या तालुक्याचा आकार लांबुळका असून तो वायव्येकडून आग्नेयेकडे पसरलेला आहे. भीमाशंकर हे या तालुक्याचे वायव्येचे शेवटचे टोक असून तुळापूरजवळ भीमा — इंद्रायणीचा संगम हे आग्नेयेचे टोक आहे. वायव्येकडून आग्नेयेकडे जाताना तालुक्याचा विस्तार वाढत जातो. या तालुक्यातून भीमा व भामा या नद्या वाहत गेल्या असून आग्नेय ही त्यांच्या प्रवाहाची दिशा आहे. तालुक्याच्या उत्तरेस आंबेगाव तालुका, पूर्वेस शिरूर तालुका, दक्षिणेस हवेली तालुका, नैऋत्येस मावळ तालुका आणि पश्चिमेस रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुका आहे.

२.४ बुरसेवाडीचे निरपेक्ष आणि सापेक्ष स्थान पुढीलप्रमाणे —

नकाशा क्रमांक —१. बुरसेवाडी स्थानदर्शक नकाशा

बुरसेवाडी गावचा स्थलदर्शक नकाशा



१.निरपेक्ष स्थान — निरपेक्ष स्थान हे अक्षवृत्ते आणि रेखावृत्ते यांच्या संदर्भात सांगितले जाते. बुरसेवाडी या गावाचे नकाशावरील स्थान पुढीलप्रमाणे सांगता येईल— अक्षवृत्तीय स्थान — १८° ५०' १०'' ते १९° १' ३०'' तर रेखावृत्तीय विस्तार — ७३° ४५' ४०'' ते ७३° ४७' ५०'' असा आहे

२.सापेक्ष स्थान — सापेक्ष स्थान आजूबाजूच्या स्थानावरून सांगितले जाते. बुरसेवाडी हे पुणे जिल्ह्यतील खेड तालुक्यात वसले आहे. ते राजगुरूनगरच्या वायव्येस २२ कि. मी. अंतरावर असून राजगुरूनगर — वाडा या रोडवर आहे. बुरसेवाडीच्या पश्चिमेस गुंडाळवाडी, उत्तरेस ढाकाळे पूर्वेस कडधे आणि दक्षिणेस कहू कोयाळी ही ठिकाणे आहेत. हे गाव भिमा नदीच्या खोऱ्यात वसलेले आहे. बुरसेवाडी हे गाव पुणे जिल्हयातील खेड तालुक्याच्या पश्चिम पट्टयातील चासकमान धरण परिसरातील गाव आहे.

२.५ बुरसेवाडी गावचे वस्ती स्थान

गावाच्या शिवेवरून भीमा नदी वाहत आहे. भिमा नदीच्या खोऱ्यात स्थान मिळालेले बुरसेवाडी सुंदर गाव आहे. या गावामध्ये एकूण नऊ वस्त्या आहेत. बुरसेवाडी गावठाणापासून साधारण २ किमी अंतराच्या परिघामध्ये या सर्व वस्त्या विखुरलेल्या आहेत. अलीकडच्या काळामध्ये गावांची प्रारूपे पालटत चाललेली आहेत. पूर्वीची सघन खेडी आता विखरू लागलेली आहेत. कारण पूर्वी संरक्षणाचा प्रश्न, चोराचिलटांची भिती यामुळे लोक एकत्र राहत असत. सध्याच्या काळात तुलनेने ही भीती कमी झालेली आहे. त्यामुळे लोकवस्ती विखुरत आहे. तिला संयुक्त वस्त्यांचे रूप येत आहे. बुरसेवाडी या गावातही अनेक विखुरलेल्या वस्त्या दिसून येतात. रोडे मळा, चंद्रावळी मळा, तोरण झुरा, इचके मळा, घिगेदरा, ठाकरवाडी, मुकेवस्ती, तनपुरे वस्ती, मागचा दरा अशा वस्त्या बुरसेवाडीमध्ये आढळून येतात.

नकाशा क्रमांक — २. बुरसेवाडी गावचा वस्ती दर्शक नकाशा



नकाशा क्रमांक — ३. बुरसेवाडी गावचा स्थलनामदर्शक नकाशा



———————————————

प्रकरण तिसरे
प्राकृतिक रचना

३.१ बुरसेवाडी — भूपृष्ठरचना

भूमी उपयोजनावर प्रत्यक्ष परिणाम करणारा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे त्या प्रदेशाची भूपृष्ठरचना होय. त्या प्रदेशातील उंच सखलपणा, उंचवटे, डोंगरकडे, खोल द—या या सर्वामुळे त्या प्रदेशाची एक ओळख निर्माण होत असते. या सर्वांचा परिणाम मानवी जीवनावर जसा होतो तसाच तो वनस्पती, प्राणी, मृदा, हवामान यांच्यावर देखील होत असतो. खेड तालुक्याला वैविध्यपूर्ण अशी भूपृष्ठरचना लाभलेली आहे. तालुक्याचा सर्वसाधारण उतार पश्चिमेकडून पूर्वेकडे आहे. अगदी पश्चिमेकडील बाजूस पश्चिम घाटाच्या म्हणजेच सहयाद्रीच्या पर्वत शिखर परिसरात उंची ९०० मीटर पेक्षा जास्त आहे.

तालुक्याच्या मध्यवर्ती प्रदेशात उंची ५५० ते ९०० मी. च्या दरम्यान आहे. तर पूर्वेकडील भाग हा ५५० मीटरपेक्षा कमी उंचीचा आहे. महाराष्ट्र शासनाने खेड तालुक्याला डोंगरी तालुका म्हणून मान्यता दिलेली आहे. कारण तालुक्याच्या पश्चिम भागात सहयाद्री पर्वतरांग व या पर्वत रांगेच्या उपरांगा वरसुबाई, शिंगेश्वर, वेळेश्वर यांनी तालुक्याचा बराचसा भाग व्यापलेला आहे.

या रांगामधील शिंगेश्वर हे तालुक्यातील सर्वात उंच ठिकाण आहे याची उंची १२९३ मीटर आहे. त्या खालोखाल कुंडेश्वर १२०६ मी., सांबरकडा ११२९ मी. सौरंगा ११२५ मी. ही शिखरे आहेत. खेड तालुक्याची पश्चिमेकडील सीमा पश्चिमघाटाने निश्चित केली आहे या ठिकाणची उंची भीमाशंकरजवळ १०५० पर्यंत आहे. सहयाद्री पर्वताला वांद्रे व आंभू या ठिकाणी खिंडी आहेत. तालुक्यात भोरगिरी, मंदोशी, आव्हाट, औदर, कुडे, चिखलगाव, या परिसरात डोंगरकडयांचा उतार तीव्र असल्याने वर्षा ऋतूत अनेक धबधबे पहावयास मिळतात.

तालुक्याच्या मध्यवर्ती भागात भीमा व भामा या नदयांच्या दरम्यान काहीसा पठारी प्रदेश आहे पाईट, कोहिंडे, या गावांपासून या पठाराचा उतार भीमा व भामा नदयांच्या संगमापर्यंत कमी होत गेला आहे. तसेच पूर्वेकडील प्रदेशात चाकण, आळंदी दरम्यानचा पठारी प्रदेश, वाफगाव, गुळाणी, कनेरसर या परिसरातही पठार आढळून येते. तालुक्यात नद्यांच्या पात्रालगत चासकमान धरणक्षेत्राच्या खाली तसेच खेड, चाकण पासून दावडी, आळंदी, मरकळ पर्यंतचा सर्व भाग मैदानी आहे.

तालुक्यामध्ये सह्यद्री पर्वताच्या ज्या अनेक रांगा पूर्वेकडे गेलेल्या आहेत त्यापैकी खेड तालुक्याच्या उत्तरेकडील भागामधूनच पश्चिमकडून पूर्वेकडील भागातून जी डोंगररांग गेलेली आहे त्या डोंगररांगेच्या पायथ्याला बुरसेवाडी हे गाव वसले आहे. या डोंगरासभोवताली माळरान आहे. या प्रदेशाची समुद्रसपाटीपासून सरासरी उंची ६०० मीटर आहे. या डोंगराचा उतार दक्षिणेकडील बाजूस भिमा नदीच्या पात्राकडे कमी कमी होत जातो. त्यामुळे बुरसेवाडीची भूपृष्ठरचना ही उंच सखल या श्रेणीत येते.

नकाशा क्रमांक तीन हा भारतीय सर्वेक्षण विभागाकडून तयार करण्यात येणारा स्थलनिर्देशक नकाशा आहे. या नकाशाचा निरीक्षण केले असता असे दिसून येते की बुरसेवाडीच्या पूर्वेस कडधे या गावाची हदद् आहे. तर पश्चिमेकडी बाजूस गुंडाळवाडी या गावाची हदद् आहे. गावाच्या दक्षिणेस भिमा ही नदी वाहते आहे. विविध सांकेतिक चिन्हे आणि खुणांच्या साहयाने इतर सांस्कृतिक आणि भौगोलिक घटक दर्शविण्यात आलेले आहेत.

नकाशा क्रमांक — ४. बुरसेवाडी भूउठावदर्शक नकाशा



नकाशा क्रमांक —५. बुरसेवाडी समोच्चरेषा दर्शक नकाशा



वरील बुरसेवाडीतील समोच्च रेषांच्या अभ्यासावरून असे स्पष्ट होते की, बुरसेवाडीमधील समोच्च रेषा उत्तरेकडील भागामध्ये सर्वात जास्त उंची ९७५ मीटर असून हा कमीतकमी उंची भिमा नदीच्या पात्रामध्ये ६२५ मीटर इतकी आहे. बुरसेवाडी गावचा ५० टक्क्याहून अधिक भाग हा ६४५ ते ७०५ मीटर उंचीच्या दरम्यान आहे.

नकाशा क्रमांक — ६. बुरसेवाडी भूपृष्ठाचा उतारदर्शक नकाशा



वरील नकाशा क्रमांक पाच हा जीआयएस प्रणालीमध्ये तयार करण्यात आलेला आहे. या नकाशाचे निरीक्षण केले असता भूपृष्ठाच्या सर्वसाधारण उताराची कल्पना येण्यास मदत होते. भूपृष्ठरचनेचा अभ्यास करत असताना भूपृष्ठाचा उतार कोणत्या दिषेला आहे ही बाब अतिशय महत्त्वपूर्ण असते. बुरसेवाडी या गावाच्या संपूर्ण परिसराचा भौगोलिक अभ्यास केला असता असे निदर्शनास येते की, भूपृष्ठाचा सर्वसाधारण उतार हा ईशान्येकडून नैऋत्येकडे आहे. बुरसेवाडी गावच्या उत्तरेकडील डोंगररांगा या दक्षिणेकडील भिमा नदीच्या पात्राकडे उतरत्या होत गेलेल्या आहेत. या डोंगररांगामध्ये उगम पावणा—या ओढयांचे प्रवाह हे भिमा नदीस येऊन मिळतात.

बुरसेवाडी हे गाव भीमा नदीच्या खोऱ्यात वसलेले आहे. हे गाव भीमा नदीच्या उत्तरेस असणाऱ्या चौराच्या डोंगराच्या पायथ्यापासून थोडेसे दूर आहे. या गावाच्या दक्षिणेस भीमा नदी व पश्चिमेस गुंडाळवाडी हे गाव आहे. गावाच्या पूर्वेस चास कमान धरणापर्यंत पसरलेली डोंगररांग आहे. गावाच्या नैऋत्येस शंभू महादेवाचा डोंगर आहे.

बुरसेवाडीचा उत्तरेकडील भाग डोंगराळ प्रदेशाने आणि दऱ्या खोऱ्यांनी व्यापलेला आहे. उत्तरेकडून दक्षिणकडे यावे तसतशी प्रदेशाची उंची कमी कमी होत जाते. डोंगराळ माळरान संपल्यानंतर माळगाळाचा भाग येतो. त्यानंतर भिमा नदीच्या आणि तिच्या उपप्रवाहांच्या संचयन कार्यामुळे तयार झालेल्या सुपीक गाळाच्या मैदानाचा भाग दक्षिणेकडे नदीपर्यंत पसरलेला आहे.

बुरसेवाडीची भूरचना बरीचशी ओबडधोबड आणि काही प्रमाणात सपाट मैदानी आहे. खालील नकाशामध्ये भूउठाव दिसून येत आहेत.

३.२ जलप्रणाली —

खेड तालुक्याचा भाग हा कृष्णा नदीची उपनदी असलेल्या भीमा खो—याचा आहे. भीमा नदीचा उगम या तालुक्यामधील भीमाशंकर येथे १०१५ मीटर उंचीवर होतो. भीमा ही तालुक्यातील प्रमुख पूर्व वाहिनी नदी आहे. भीमा नदी शिवाय भामा, इंद्रायणी, वेळ या नदयाही तालुक्यातून वाहतात. यापैकी भामा नदीचा उगम पश्चिम घाटातील पढरवाडी या गावाजवळ होतो. पुढे ही नदी शेलपिंपळगावाजवळ भीमा नदीस मिळते. या नदीवर करंजविहीरे या गावाजवळ 'भामा आसखेड' या नावाने धरण बांधण्यात आले आहे. इंद्रायणी नदी तालुक्याची दक्षिण सीमा निश्चित करते व पुढे तुळापूर या ठिकाणी भीमा नदीस मिळते. 'वेळ' ही आंबेगाव तालुक्यातील वेळेश्वर येथे उगम पावते. सातगाव पठार प्रदेशातून वाहत

जाऊन तालुक्यातील पूर्वेकडील वाफगाव, वरूडे, कनेरसर या गावामधून वाहते. या षिवाय आरळा नदी सहयाद्रीच्या माथ्यावर तांबडेवाडी येथे उगम पावते व वाडा गावाजवळ भीमा नदीस मिळते. आरळा नदीस चिखलगावाजवळ 'येणोरा' नदी येऊन मिळते. आरळा या नदीवरही कळमोडी येथे एक धरण बांधण्यात आले आहे. या शिवाय शिंगेश्वर डोंगरावर उगम पावणारी व पूर्वेकडे वाहणारी कुमंडला नदी कडूस गावाजवळ भीमा नदीस मिळते.

बुरसेवाडी गावातून उत्तरेकडून दक्षिणेकडे असा एकच ओढा वाहतो. त्या ओढयास वेहळदराचा ओढा असे म्हणतात. या ओढ्याला पश्चिमेकडून शंभूचा ओढा येवून मिळतो. त्यांचा संयुक्त प्रवाह दक्षिणेकडे भिमा नदीस जावून मिळतो. या ओढयास पूर्वेकडून आणि पश्चिमकडून अनेक प्रवाह आणि झुरे येवून मिळतात. तोरणझुरा, घिगे झुरा, मागचा झुरा, बोरझुरी हे प्रवाह या ओढयास येवून मिळतात.

नकाशा क्रमांक — ७. बुरसेवाडी जलप्रणाली



३.३ मृदा

मृदा हा शेती व्यवसायावर परिणाम करणारा मूलभूत घटक असतो. कोणत्याही प्रदेशातील मृदेचे स्वरूप आणि गुणधर्म त्या प्रदेशातील भौगोलिक रचना आणि हवामान यावर अवलंबून असते. खेड तालुक्याचा भाग हा लाव्हारसाच्या संचयनापासून तयार झालेला असल्यामुळे बेसॉल्ट या खडकापासून तयार झालेली

काळी मृदाच तालुक्यात सर्वत्र आढळते. परंतु पर्जन्य व तापमानातील बदलामुळे या मृदेच्या रंगामध्ये व रासायनिक गुणधर्मामध्ये प्रादेशिक भिन्नता आढळून येते. पश्चिमेकडून पूर्वेकडे जाताना हे बदल ठळकपणे जाणवतात. सहयाद्री पर्वताच्या अतिपर्जन्य असलेल्या परिसरात वांद्रे, आडगाव, आंभू, भलवडी, आढे, आंबोली, वि—हाम, वाघु, भोरगिरी, भिमाशंकर या पश्चिम पट्टयात लॅटेराईट (जांभी) प्रकारची मृदा आढळते. जास्त पावसामुळे मूळच्या काळया मृदेत बदल होऊन या मृदेची निर्मिती झालेली आहे. तालुक्याच्या मध्यवर्ती पठारावर साधारण तपकिरी रंगाची मृदा आढळते. नदयांच्या पात्रालगतच्या प्रदेशात आणि पूर्वेकडील मैदानी प्रदेशात काळया मृदेचे प्रमाण सर्वाधिक आहे. तालुक्यातील डोंगरकडयांच्या उतारावर व पायथ्यालगत मुरूमाड व पांढुरक्या मृदेचा आढळ जाणवतो. मृदेतील या विविधतेमुळे तालुक्यामध्ये पीकविविधता आढळून येते. नदी पात्रालगतच्या व मैदानी काळया मृदेच्या परिसरात पाण्याच्या मुबलकतेमुळे भाजीपाल्याची व बागायती पिके घेतली जातात. पठारावरील प्रदेशात पर्जन्याधारित खरीपाची व रब्बीची पिके घेतली जातात. यामध्ये बाजरी, भुईमूग, ज्वारी या बरोबरच पावसाळी बटाटयाचे पीक पाईट, कोहिंडे परिसर तसेच गुळाणी, वाफगाव, कनेरसर या परिसरात मोठया प्रमाणात घेतले जाते. पश्चिमेकडील जास्त पर्जन्याच्या प्रदेशात भात, नाचणी ही प्रमुख पिके घेतली जातात.

बुरसेवाडीच्या परिसरामध्ये मृदेमध्ये बरेचसे वैविध्य आढळून येते. बुरसेवाडीच्या उत्तरेकडील डोंगरावर साधारण तपकिरी रंगाची व मुरमाड मृदा आढळून येते. उत्तरेकडून दक्षिणेकडील भिमा नदीच्या पात्राकडे जाताना मृदेमध्ये बराचसा बदल आढळून येतो. ओढयांच्या खोऱ्यात तसेच नदीलगतच्या सपाट मैदानी प्रदेषात काळी मृदा मुबलक प्रमाणात आढळून येते. या मृदेमध्ये वर्शभर विविध बागायती पिके घेतली जातात.

३.४ हवामान —

हवामान हा भौगोलिक, आर्थिक व सामाजिक घटकांवर परिणाम करणारा अतिशय महत्त्वाचा घटक असतो. तालुक्यातील हवामान ढोबळमानाने उष्णकटिबंधीय मोसमी हवामान या प्रकारात मोडते. परंतु सहयाद्री पर्वताचे सान्निध्य लाभल्यामुळे पश्चिमेकडून पूर्वेकडे जाताना हवामानामध्ये बदल होत गेला आहे. हवामानाचे दर्शक म्हणून पर्जन्य व तापमान या घटकांचा विचार करावा लागतो. वर्षा ऋतूमध्ये

साधारणपणे जून ते ऑक्टोबर महिन्यात सर्वाधिक म्हणजे ८५ टक्के पाऊस पडतो. तालुक्यातील सहयाद्रीचे सान्निध्य असलेल्या वांद्रे, आडगाव, आंभू, तोरणे खु., भलवडी, आढे, आंबोली, वि—हाम, वाघु, भोरगिरी, भिमाशंकर या परिसरात सरासरी २१८ इंचापेक्षा जास्त पाऊस पडतो. येथून पूर्वेकडे वाडा, पाईट, या पट्टयात पाऊस कमी होऊन सरासरी १४४ इंच होतो. हाच पाऊस तालुक्याच्या पूर्वेकडील पट्टयात साधारण राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० च्या पूर्वेकडे सरासरी ७५ ते १०० इंच इतकाच पडतो. तालुक्याचे वार्षिक सरासरी तापमान ३२° ते ३८° सेल्सीअसच्या दरम्यान आढळते. तापमान देखील पूर्वेकडे जाताना वाढत जाते. पर्जन्य आणि तापमान यांच्यातील फरकामुळे वनस्पती व कृषी यामध्ये पश्चिमेकडून पूर्वेकडे जाताना बदल होतो.

निमगावचे हवामान हे मोसमी असून येथे जून ते सप्टेंबर या काळात नैऋत्य मान्सून वाऱ्यापासून पाऊस मिळतो. ईशान्य मान्सून वाऱ्यापासून मिळणाऱ्या पावसापेक्षा नैऋत्य मान्सून पासून अधिक पाऊस मिळतो. येथील टेकड्यांवर जास्त पाऊस पडतो. पावसाचे प्रमाण ६७° सेंमी आहे. सप्टेंबर नंतर पावसाचे प्रमाण कमी होते. ईशान्य मान्सूनपासून तुरळक पाऊस पडतो. हिवाळे थंड व कोरडे असतात. उन्हाळ्यातील कमाल तापमान ४०° से असून हिवाळ्यतील किमान तापमान ८° से असते.

३.५ वनस्पती —

बुरसेवाडी गावाच्या बाजूने डोंगराळ प्रदेश असल्याने तसेच शेजारीच नदीचा परिसर व पावसाचे प्रमाणही जास्त असल्याने डोंगरांच्या उतारावर व पायथ्याशी जंगले असलेली दिसून येतात. शंभू महादेव डोंगर व परिसरातील वनांना शासनाने संरक्षित वनांचा दर्जा दिलेला आहे. या व्यतिरिक्त ओढ्याचे काठ, शेताचे बांध येथेही वृक्ष उगवलेले आढळतात. माळरानांनवर गवत वाढलेले आहे. येथील वने उष्ण कटिबंधीय पाणझडी वने आहेत. या वनांना वसंत ऋतूत पालवी फुटते. पावसाळ्यात व हिवाळ्यात फेब्रुवारी महिन्यापर्यंत ही वने हिरवीगार असतात. नंतर शिशिर ऋतूत वृक्षे पाने गाळतात. या गावामध्ये वड, निलगिरी, अशोक, कुबाभूळ, साग, हिवर, खैर, कडुनिंब, आपटा, अंजन, बदाम, आंबा, बोरी, जांभळ, केळी, चिंचा, उंबर, चाफा, सुबाभूळ, हिरडा, बिबळा, शेवगा, पेरू, टणटणी...इ. वृक्ष आहेत.

३.६ प्राणी आणि पक्षी —

बुरसेवाडी गावामध्ये तसेच आसपासच्या परिसरात विविध प्राणी व पक्षी आढळून येतात त्यापैकी काही पुढीलप्रमाणे सांगता येतील— कावळे, चिमण्या, घारी, गिधाडं, घुबडे, वटवाघुळे, कोल्हे, लांडगे, तरस, खोकड, साप तसेच परिसरात ससा, शेकरू, पिसारी, भेकर, सांबर, खोकड, भारतीय छोटे उदमांजर, उदमांजर, लालतोंडी वानर, रानडुक्कर, तरस, बिबटया वाघ, वाघ, खार, हे प्राणी तर नाग, मण्यार, घोणस, फुरसे, चापडा, मांज—या, खापरखवल्या, पहाडी तस्कर, धामण, दिवड, अजगर, या सापांच्या जाती आढळतात. याषिवाय पक्षांमध्ये मोर, भारद्वाज, वेडा राघु, पाण कावळा, रातवा, वंचक, मराठा सुतार, तसेच कीटकांमध्ये सेरूलिन, कॉमन लेपर्ड, डॅनीड एग फ्लाय, ब्लु मॉरमॉन, पेंटेड लेडी, व बॅरोनेट हे विविध प्रकार आढळतात.

३.७ वाहतूक व दळणवळण

खेड तालुक्यामध्ये वाहतुकीचे प्रमुख माध्यम रस्ते हेच आहे. तालुक्यामध्ये एकूण पाच प्रकारचे रस्त्यांचे प्रकार आढळतात. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० पुणे ते नाशिक यांना जोडणारा हा रस्ता चाकण राजगुरूनगर येथून जातो. या रस्त्याची तालुक्यातील लांबी २१ किमी आहे. त्याच प्रमाणे ५४ व ५५ क्रमांकाचे दोन राज्य महामार्ग तालुक्यातून गेलेले आहेत. यापैकी राज्य महामार्ग क्रमांक ५४ शिरूर ते भिमाशंकर याची तालुक्यातील लांबी ६७ किमी आहे. तर राज्य महामार्ग क्रमांक ५५ शिक्रापूर ते तळेगाव दाभाडे या रस्त्याची तालुक्यातील लांबी ३८ किमी आहे. याशिवाय जिल्हा रस्ते व तालुका पातळीवरील रस्त्यांनी तालुक्यातील महत्त्वाची बाजारपेठांची ठिकाणे जोडलेली आहेत. या प्रमुख रस्त्यांमध्ये राजगुरूनगर ते पाईट आंबोली रस्ता, राजगुरूनगर ते कडूस — औदर, कुडा रस्ता, राजगुरूनगर वाडा भोरगिरी रस्ता, चाकण आंबेठाण करंजविहीरे रस्ता, हे प्रमुख रस्ते आहेत. तालुक्यामध्ये वीज व टेलीफोनचे जाळे गावागावापर्यत विकसित झालेले आहे. याद्वारे संदेशवहन अतिशय जलद गतीने होते. महाराष्ट्र नॅचरल गॅस वाहिनीची एक शाखा चाकण औद्योगिक वसाहतीमध्ये आलेली आहे. बुरसेवाडी हे गाव राजगुरूनगर ते वाडा या रस्त्यावर २२ किमी अंतरावर आहे. हा रस्ता या गावातील मुख्य रस्ता आहे. या रस्त्यांना जोडणारे तनपुरे दरा रोड, रोडे दरा रोड, जैदवस्ती रस्ता आणि जुना बिबी रस्ता हे रस्ते जोडतात.

नकाशा क्रमांक — ८. बुरसेवाडी गावचा वाहतूक व दळणवळण



नकाशा क्रमांक — ९. बुरसेवाडी — भूवक्रतादर्शक नकाशा



———————————————————————————————————

प्रकरण — ४

सामाजिक घटक

४.१ लोकसंख्या —

भूगोलाच्या अभ्यासकाला कोणत्याही भूप्रदेशाचा अभ्यास करताना मानवी घटकांचाही विचार करावा लागतो. लोकसंख्या हा मानवी घटकातील महत्त्वाचा घटक आहे. या अभ्यासामध्ये बुरसेवाडी या खेड्यातील लोकसंख्येचा व लोकसंख्या वैशिष्ट्यांचा अभ्यास केलेला आहे. या अभ्यासामध्ये १३६ कुटुंबांचा अभ्यास केलेला आहे. हे नमूना सर्वेक्षण ४० टक्के आहे. या अभ्यासात लोकसंख्या विषयक पुढील वैशिष्ट्यांचा समावेश केलेला आहे.

४.२ धर्मनिहाय वितरण —

बुरसेवाडी या गावातील लोकांची धर्मनिहाय लोकसंख्या पुढीलप्रमाणे

तक्ता क्रमांक — १. बुरसेवाडी गावचे धर्मनिहाय लोकसंख्येचे शेकडा वितरण

अ.क्र	धर्म	घरांची संख्या	टक्केवारी
१	हिंदू धर्म	१३३	९७.७९
२	इस्लाम धर्म	००	००
३	बौद्ध धर्म	३	२.२०
	एकूण	**१३६**	**१००**

आलेख क्रमांक — १. बुरसेवाडी गावचे धर्मनिहाय लोकसंख्येचे वितरण



वरील विभाजित वर्तुळावरून आपल्या लक्षात येते की बुरसेवाडीमध्ये हिंदूधर्मीय लोकांची संख्या खूपच जास्त म्हणजे सुमारे ९७.७९ टक्के आहे आणि बौद्धधर्मीय लोकांचे प्रमाण २.२० टक्के आहे. या व्यतिरिक्त इतर धर्मांचे लोक येथे आढळून येत नाहीत.

४.३ .लिंग गुणोत्तर —

प्रस्तुत गाव सर्वेक्षण अहवालामध्यचे लिंग गुणोत्तर काढण्यासाठी खालील सूत्राचा उपयोग करण्यात आला आहे.

अभ्याससूत्र:

$$\text{लिंग गुणोत्तर} = \frac{\text{स्त्रीयांची एकुण संख्या}}{\text{पुरूषांची एकुण संख्या}} \times 1000$$

लिंग गुणोत्तरामध्ये स्त्री व पुरूषांच्या संख्येचा विचार केला जातो. दर हजार पुरूषांमागे स्त्रियांची संख्या किती आहे हे लिंग गुणोत्तरावरून लक्षात येते. ७४५ लोकांचा येथे अभ्यास केला आहे. यापैकी ३७५ पुरूष असून ३७० स्त्रिया आहेत. हे प्रमाण १००० : ९८६ इतके आहे. हे प्रमाण महाराष्ट्राच्या लोकसंख्या गुणोत्तराच्या प्रमाणाच्या तुलनेत जास्त आहे.

तक्ता क्रमांक — २. बुरसेवाडी गावचे लिंगनिहाय लोकसंख्येचे शेकडा प्रमाण

अ.क्र	लिंग गुणोत्तर	लोकसंख्या	टककेवारी
१	पुरूष	३७५	५०.३३
२	स्त्रिया	३७०	४९.६६
	एकूण	**७४५**	**१००**

आलेख क्रमांक — २. बुरसेवाडी गावचे स्त्री—पुरूष शेकडा प्रमाण



४.४ वयोगट रचना —

वयोगट रचना हे लोकसंख्येचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असते कारण लोकसंख्येमध्ये असणाऱ्या बालकांना व वृद्धांना अनुत्पादक लोकसंख्या समजली जाते.

केवळ पंधरा ते साठ या वयोगटातील लोकसंख्याच उत्पादक व कार्यप्रवण लोकसंख्या असते. बुरसेवाडी गावातील लोकांची वयोगटरचना पुढीलप्रमाणे आहे.

तक्ता क्रमांक — ३. बुरसेवाडी वयोगटानुसार लोकसंख्येचे विभाजन शेकडा प्रमाण

अ.क्र	वयोगट	लोकसंख्या	लोकसंख्या टक्केवारीत
१	०ते१४	१३३	१७.८४
२	१५ ते २१	१०४	१३.९५
३	२२ ते ४०	२८६	३८.३८
४	४१ ते ६०	१२६	१६.९१
५	६० च्या पुढे	९६	१२.८८
	एकूण	**७४५**	**१००**

आलेख क्रमांक — ३. बुरसेवाडी गावचे वयोगटानुसार लोकसंख्येचे शेकडा प्रमाण



बुरसेवाडी गावातील नमुना सर्वेक्षणाच्या आधारे वयोगटानुसार लोकसंख्येच्या शेकडा प्रमाणाचा अभ्यास केला असता असे दिसून येते की ० ते १४ या वयोगटामध्ये १७.८४ टक्के मुलांचा सहभाग आहे. १५ ते २१ या वयोगटामध्ये १३.९५ टक्के लोकांचा सहभाग आहे. २२ ते ४० वयोगटात ३८.३८ टक्के लोकांचा सहभाग आहे. ४१ ते ६० वयोगटात १६.९१ टक्के लोकांचा सहभाग आहे. आणि ६० वर्षाच्या पुढे असणाऱ्या वृद्धांचे प्रमाण १२.८८ टक्के आहे.

४.५. वैवाहिक स्थिती —

बुरसेवाडी गावातील नमुना सर्वेक्षणाच्या आधारे वैवाहिक स्थिती अशी आहे. ७४५ लोकसंख्येपैकी विवाहितांची संख्या ४६९ असून अविवाहितांची संख्या

२७६ आहे. हे प्रमाण टक्केवारी नुसार ६२.९५ टक्के विवाहित ३७.०५ टक्के अविवाहित असे आहे.

तक्ता क्रमांक — ४. बुरसेवाडी वैवाहिक स्थिती शेकडा प्रमाण

अ.क्र	वैवाहिक स्थिती	लोकसंख्या	टककेवारी
१	विवाहीत	४६९	६२.९५
२	अविवाहीत	२७६	३७.०५
	एकूण	**७४५**	**१००**

आलेख क्रमांक — ४. बुरसेवाडी वैवाहिक स्थिती शेकडा प्रमाण



४.६. शिक्षण —

बुरसेवाडी हे खेडेगाव असल्याने पूर्वी येथे शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे पूर्वी निरक्षर लोकांचे प्रमाण जास्त होते. कालांतराने शाळा निघाल्याने साक्षर लोकांचे प्रमाण वाढले. बुरसेवाडीतील नमुना सर्वेक्षनाच्या आधारे अभ्यासलेली शैक्षणिक स्थिती पुढीलप्रमाणे

तक्ता क्रमांक — ५. बुरसेवाडी गावाची शैक्षणिक स्थिती शेकडा प्रमाण

अ.क्र	शैक्षणिक पातळी	संख्या	टक्केवारी
१	निरक्षर	२०७	२७.७८
२	चौथी	९४	१२.६१
३	सातवी	८९	११.५४
४	दहावी	१९७	२६.४४
५	बारावी	९७	१३.०२
६	पदवीधर	४२	५.६३
७	पदव्युत्तर	९	१.२०
८	ठतर	१३	१.७४
	एकूण	**७४५**	**१००**

आलेख क्रमांक — ५. बुरसेवाडी गावाची शैक्षणिक स्थिती शेकडा प्रमाण



वरील आलेखावरून आपणास बुरसेवाडी गावातील शैक्षणिक स्थितीचा अंदाज येतो. या गावात ५ वी ते १० वी या दरम्यान शिकलेल्या लोकांचे प्रमाण सर्वाधिक असून निरक्षर लोकांचे प्रमाणही लक्षणीय आहे. मात्र पदव्युत्तर शिक्षण व अन्य प्रकारचे उच्च शिक्षण यांचे प्रमाण नगण्य आहे.

४.७.स्थलांतर —

बुरसेवाडी गावात स्थलांतराची प्रवृत्ती जास्त आढळते. ७४५ लोकसंख्येपैकी १३८ लोकांनी स्थलांतर केलेले आहे. त्यापैकी ८५ लोकांनी तालुक्याच्या ठिकाणी स्थलांतर केलेले आहे. १४ लोकांनी पुण्याला स्थलांतर केलेले आहे तर ३८ लोकांनी मुंबईला स्थलांतर केलेले आहे.

———————————————

प्रकरण पाचवे

आर्थिक घटक

५.१ व्यावसायिक रचना

भारतातील जवळपास सर्व खेडी ही कृषी व्यवसायावर निर्भर आहेत. खेड्यातील बहुसंख्य जनता प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या शेती व्यवसायावर अवलंबून आहे. बुरसेवाडी गावातील जवळपास सर्वच लोक शेती व्यवसाय करताना दिसतात. या शिवाय पशुपालन, मजुरी नोकरी व इतर व्यवसातही लोक गुंतलेले आहेत.क्षेत्र अभ्यासातील १३६ कुटुंबातील ७४५ लोकांपैकी ४७६ लोकांची व्यवसायिक रचना पुढीलप्रमाणे आहे.

तक्ता क्रमांक — ६. बुरसेवाडी व्यावसायिक रचना शेकडा प्रमाण

अ.क्र	व्यवसाय	एकूण संख्या	टक्केवारी
१	शेती	१९५	४०.९६
२	शेतमजुरी	१६८	३५.२९
३	पशूपालन	५४	११.३४
४	नोकरी	४५	९.४५
५	उद्योग	२	०.४
६	व्यापार	३	०.६
७	इतर	९	१.०९
८	**एकूण**	**४७६**	**१००**

आलेख क्रमांक — ६. बुरसेवाडी व्यवसायिक रचना शेकडा प्रमाण



वरील विभाजित वर्तुळारून असे लक्षात येते की बुरसेवाडीतील अभ्यास केलल्या १०५ कुटुंबातील ७४५ व्यक्तींपैकी १९५ व्यक्ती अंशत: किंवा पूर्णत: शेती व्यवसायात गुंतले आहेत. यापैकी ५४ व्यक्ती शेती बरोबर पशुपालनही करतात. १६८ व्यक्ती शेती बरोबरच मजूरीही करतात. नोकरी करणाऱ्यांची संख्या ४५ असून

त्या सर्वांकडे शेत जमीनीही आहेत. या व्यतिरिक्त १४ व्यक्ती इतर व्यवसाय करत आहेत. त्यांनाही स्वत:ची थोडी बहुत शेती आहे.

५.२ नोकरी —

बुरसेवाडी गावातील १३६ कुटुंबातील ७४५ लोकांपैकी ४५ लोक कायमस्वरूपी नोकरीत आहेत. १६ लोक तात्पुरत्या स्वरूपाच्या नोकरीत आहेत तर ६६ लोक हंगामी स्वरूपाच्या नोकरीत आहेत.

५.३ प्रमुख धान्य पिके —

बुरसेवाडीचा काही भाग जिरायत असून काही भाग बागायत आहे. येथे शेतीतून विविध प्रकारची पिके घेतली जातात. पिकांचे प्रकार आणि उत्पादन पुढीलप्रमाणे.

तक्ता क्रमांक — ७. बुरसेवाडी गावातील कडध्यान्य व धान्य पिकांचा प्रकार

अ.क्र	पिकांचा प्रकार	उत्पादन क्विंटलमध्ये
१	ज्वारी	९०
२	बाजरी	८०
३	गहू	४५
४	मका	६३
५	उडीद	६
६	तांदूळ	३४
७	मूग	११
८	हरभरा	३६
९	भुईमूग	७६

आलेख क्रमांक — ७. बुरसेवाडी गावातील कडध्यान्य व धान्य पिकांचा प्रकार



वरील आलेखावरून असे लक्षात येते की बुरसेवाडीमध्ये सर्वात अधिक उत्पादन हे ज्वारी या पिकाचे असून ते एकूण ९० क्विंटल इतके आहे. त्यापाठोपाठ बाजरी या पिकाचा क्रमांक लागतो. बाजरीचे एकूण उत्पादन ८० क्विंटल इतके आहे. गव्हाचे एकूण उत्पादन ४५ क्विंटल असून मकेचे ६३ क्विंटल आहे. त्यामानाने इतर पिकांचे उत्पादन कमी आहे.

५.४ प्रमुख बागायती पिके —

तक्ता क्रमांक — ८. बुरसेवाडी — अन्नधान्य बागायती पिकांचा प्रकार

अ.क्र	पिकांचा प्रकार	उत्पादन क्विंटलमध्ये
१	मेथी	१०
२	कोथींबीर	११
३	कांदा	४१
४	बटाटा	३७
५	वांगी	१०
६	ऊस	१
७	भेंडी	१०
८	मिरची	१३
९	टोमॅटो	७
१०	कोबी	४
११	फ्लावर	३

वरील आलेखावरून आपल्या लक्षात येते की इतर पिकांमध्ये बहुधा तरकारी पिकांचे उत्पादन घेतले होते. निमगाव या गावामध्ये जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध असल्यामुळे बागायती पिके अधिक प्रमाणात घेतली जातत. निमगाव हे गाव कोबी आणि फ्लावर या पिकांचे आगार म्हणून ओळखले जाते. त्याचप्रामणे कोंथीबीर आणि मेथी या पिकांचेही उत्पन्न मोठया प्रमाणावर घेतले जाते.

५.५ जलसिंचनाच्या सोयी —

तक्ता क्रमांक — ९. बुरसेवाडी जलसिंचनाच्या सुविधा शेकडा प्रमाण

अ.क्र	जलसिंचनाचे माध्यम	ष शेतकरी कुटुंबे	टक्केवारी
१	विहीर	४८	५६.४७
२	कालवा	३	३.५२
३	कूपनलिका	१९	२२.३५
४	नदी	६	७.०५
५	तलाव	९	१०.५८
	एकूण	**८५**	**१००**

आलेख क्रमांक — ८. बुरसेवाडी जलसिंचनाच्या सुविधा शेकडा प्रमाण



वरील विभाजित वर्तुळावरून आपल्या असे लक्षात येते की शेतीसाठी जलसिंचनाकरिता विहीरीचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. तर नदी, कूपनलिका आणि कालवा यांचा कमी प्रमाणात वापर होतो. गावाजवळ भिमा नदीवर धरण असल्याने भिमा नदीतील पाण्याचा सिंचनासाठी उपयोग केला जातो.

५.६ जमिनीचे प्रमाण —

तक्ता क्रमांक — १०. बुरसेवाडी गावातील जमिनीचा प्रकार शेकडा प्रमाण

अ.क्र	जमीनीचा प्रकार	क्षेत्र (एकरात)	टक्केवारी
१	जिरायती	१४९	५५.५९
२	बागायती	१०१	३७.६८
३	पडीक	१८	६.७१
	एकूण	**२६८**	**१००**

आलेख क्रमांक — ९. बुरसेवाडी गावातील जमिनीचा प्रकार शेकडा प्रमाण



वरील वर्तुळालेखावरून लक्षात येते की बुरसेवाडीतील सर्वेक्षण केलेल्या एकूण १३६ कुटुंबांना एकूण २६८ एकर जमीन आहे. यापैकी बागायत जमीनीचे क्षेत्र १४९ एकर आहे जिरायत क्षेत्र १०१ एकर आहे. तर पडिक क्षेत्र १८ एकर आहे.

५.७ वार्षिक उत्पन्न —

वरील व्यवसायामधून सर्वेक्षण केलेल्या १३६ कुटूंबातील ७४५ लोकांना उत्पन्न मिळते. त्यामध्ये बहुतांशी व्यक्तींना शेतीमधूनच उत्पन्न मिळताना दिसते कारण शेतीमध्ये काम करणाऱ्या लोकांची संख्या कार्यक्षम लोकसंख्येच्या जवळ जवळ ४० टक्के आहे. तसेच शेतीबरोबरच पशुपालन, शेतमजुरी, स्वत:चा व्यवसाय, सरकारी किंवा खाजगी नोकरी इ च्या माध्यमांतूनही खरपुडी गावातील लोकांना उत्पन्न मिळताना दिसते.

पुढील तक्त्याच्या आधारे आपण येथील लोकांचे सरासरी उत्पन्नाची आकडेवारी पाहू

तक्ता क्रमांक — ११. बुरसेवाडी — कुटूंबनिहाय वार्षिक उपन्न शेकडा प्रमाण			
अ.क्र	**वर्षिक उत्पन्न**	**कुटूंबांची संख्या**	**टक्केवारी**
१	१०००० पेक्षा कमी	१६	१७.७६
२	१०००० ते २००००	५८	४२.६४
३	२०००० ते ५००००	४०	२९.४१
४	५०००० ते १०००००	१५	११.०२
५	१००००० पेक्षा जास्त	७	५.१४
	एकूण	**१३६**	**१००.००**

आलेख क्रमांक — १०. बुरसेवाडी गावातील वार्षिक उत्पन्न शेकडा प्रमाण



वरील आलेखात दर्शविल्याप्रमाणे बुरसेवाडी गावातील लोकांचे उत्पन्नाचे प्रमाण दिसून येते. व्यवसायांमधून त्यांना वरीलप्रमाणे उत्पन्नचा लाभ होतो. सर्वेक्षण केलेल्या १३६ कुटुंबातील लोकांपैकी एकूण १० हजारपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटूंबांची संख्या १६ इतकी आहे. यामध्ये प्रामुख्याने ठाकर जमातीची कुटूंबे तसेच रामोषी व काही भूमीहीन षेतमजूरांचा समावेष होताना दिसतो.१० हजार ते २० हजार उत्पन्न असणाऱ्यांची संख्या सर्वात जास्त म्हणजे ५८ असून त्याखालोखाल ४० कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न हे २० हजार ते ५० हजारांच्या दरम्यान आहे. ५० हजार ते १ लाख रूपये उत्पन्न असलेली १५ कुटूंबे आहेत. तर सर्वात कमी कुटूंबांचे उत्पन्न हे १ लाखांपेक्षा कमी आहे. त्यांची संख्या ६ आहे. सरासरी विचार करता सर्वात कमी व सर्वात जास्त उत्पन्न असलेल्यांची संख्या कमी असून मध्यम उत्पन्न असणारी कुटूंबे जास्त प्रमाणात आढळतात.

५.८ पशुपालन —

अभ्यास केलेल्या कुटुंबांपैकी बरीचशी कुटुंबे पशूपालन हा व्यवसाय करतात. गाय — बैल, शेळया, कोंबड्या, हे पशू पाळले जातात. पुढील कोष्टकावरून किती कुटुंबे कोणते पशू पाळतात हे लक्षात येते.

तक्ता क्रमांक — १२. बुरसेवाडी पशूपालन शेकडा प्रमाण

अ.क्र	पशूचा प्रकार	प्राण्यांची संख्या
१	गायी	१२२
२	शेळ्या/ मेंढ्या	१३३
३	कोंबड्या	१०८
४	बैल	८६

आलेख क्रमांक — ११. बुरसेवाडी पशुपालन शेकडा प्रमाण



वरील वर्तुळालेखावरून असे लक्षात येते की, बुरसेवाडी या गावात सर्वेक्षण केलेल्या कुटुंबापैकी गाई या प्राण्याची एकूण संख्या १२२ असून शेळ्यांमेंढ्यांची संख्या १३३ आहे. कोंबड्यांची संख्या १०८ आहे. बैलांची संख्या कमी असून ती केवळ ८६ इतकी आहे.

५.९ लोकवस्ती –

लोक निवारा करून राहतात त्यास वसाहती असे म्हणतात. बुरसेवाडीमधील लोकांच्या वसाहती पुढील प्रमाणे आहेत. बुरसेवाडी हे एक संयुक्त खेडे आहे. खेड्याची रचना गोलाकृती असून खेडे पूर्वपश्चिम पसरले आहे. घरे दाटीवाटीने वसलेली नसून काही अंतर सोडून वसलेली आहेत. बरेचसे लोक शेतावर राहायास गेलेले असल्याने शेतामध्ये विखुरलेल्या वसाहती आढळतात. काही ठिकाणी शेतामध्ये घरांचे पुंजके आढळतात.संयुक्त वसाहती हे भारतीय खेड्यांचे वैशिष्ट्य येथेही दिसून येते. रोडे मळा, चंद्रावळी मळा, तोरण झुरा, इचके मळा, घिगे दरा, ठाकरवाडी, मुकेवस्ती, तनपुरे वस्ती, मागचा दरा या वस्त्या शेतावर वसलेल्या दिसून येतात.

५.१० घरांची रचना –

कोणत्याही परिसरामध्ये घरे बांधणीवर हवामान, भौगोलिक घटक, आर्थिक स्थिती आणि संस्कृती या घटकांचा परिणाम होताना दिसतो. बुरसेवाडी हे मध्यम पर्जन्याच्या प्रदेशात येते असल्याने साधारण उतरत्या छपराची कौलारू घरे अधिक प्रमाणात दिसुन येतात. परिसरातील साहित्यांचा वापर करूनच ही घर बांधलेली दिसतात. परंतु आधुनिकीकरणामुळे बुरसेवाडीत सिमेंट, वाळू, आणि विटा यांचा वापर करून घरे बांधण्यास प्राध्यान्य दिले जाऊ लागले आहे. घरे असून काही घरे पत्र्याची घरे आढळली. घरांचे वर्णन पुढीलप्रमाणे

५.११ भिंतींचे प्रकार –

बुरसेवाडी गावातील घरांच्या भिंती दगड, माती, वीटा, व सिमेंटच्या साह्याने बांधलेल्या आहेत.गरीब लोकांच्या घरांच्या भिंती या कच्च्या असून त्या दगड व माती यांनी बांधलेल्या आहेत. काही घरे ही विटांनी बांधलेली असून काही घरे सिमेंटने बांधलेली आहेत. हे प्रमाण पुढीलप्रमाणे.

तक्ता क्रमांक — १३. बुरसेवाडी गावातील घराच्या भिंतीचा प्रकार शेकडा प्रमाण			
अ.क्र	**भिंतीचा प्रकार**	**कु.संख्या**	**टक्केवारी**
१	गवताच्या भिंत	३	२.२०
२	कच्च्या वीटा	५६	४१.१७
३	डबर	१३	९.५५
४	तोडी	९	६.६१
५	भाजक्या विटा	५३	३८.९७
६	सिमेंट	२	१.४७
	एकूण	**१३६**	**१००**

वरील सारणीवरून असे लक्षात येते की बुरसेवाडीच्या अभ्यासलेल्या १३६ कुटुंबापैकी ३ घरांच्या भिंती गवताच्या असून ५६ घरांच्या भिंती कच्च्या विटांनी बांधलेल्या आहेत. १३ घरांच्या भिंती डबराने बांधलेल्या आहेत. ९ घरांच्या तोडीने, ५३ घरांच्या भाजक्या विटांनी ते २ घरांच्या सिमेंटच्या विटांनी बांधलेलया आहेत.

५.१२ घराच्या छप्पराचे प्रकार —

बुरसेवाडीतील घरांची छप्परे अनेक वेगवेगळया वस्तूंपासून बनविलेली आहेत. गवत,कौलारू, पत्रा, कॉक्रिट यांच्या साहायाने घरांचे छप्पर तयार केले आहे. ते पुढीलप्रमाणे.

तक्ता क्रमांक — १४. बुरसेवाडी गावातील घरांच्या छपराचा प्रकार शेकडा प्रमाण			
अ.क्र	**छपराचा प्रकार**	**संख्या**	**टक्केवारी**
१	गवत	२	१.४७
२	गावरान कौलारू	२४	१७.६४
३	वि. कौलारू	३९	२८.६७
४	पत्रा	६०	४४.११
५	कॉक्रिट	११	८.०८
	एकूण	**१३६**	**१००**

वरील आलेखावरून बुरसेवाडीमधील सर्वेक्षण केलेल्या १३६ घरांपैकी २ घरांचे छप्पर हे गवताचे असून २४ घरांचे छप्पर गावरान कौलारू आहे. ३९ घरांचे छप्पर विलायती कौलारू असून ६० घरांवर पत्रे आहेत. ११ घरांचे छप्पर कॉक्रिटचे आहे.

५.१३ आहार —

बुरसेवाडीतील लोक शाकाहारी आणि मिश्राहारी असे दोन्ही प्रकारचे भोजन घेतात. २१५ लोक पूर्णत: शाकाहारी असून ५३० लोक मिश्राहारी आहेत. हे लोक आपल्या आहारात पुढील पदार्थांचा वापर करतात. बुरसेवाडी या गावामध्ये गावातील

शेतजमिनीमध्ये जे अन्नधान्य पिकते त्याचा उपयोग मोठया प्रमाणात आहारामध्ये केला जातो. या संदर्भात खालील सारणीचा अभ्यास केल्यानंतर आपणास माहिती मिळते.

तक्ता क्रमांक — १५. बुरसेवाडी — लोकांच्या आहारातील घटक पदार्थ शेकडा प्रमाण

अ.क्र	आहाराचा प्रकार	कुटुंबांची संख्या
१	ज्वारीची भाकरी	९१
२	बाजरीची भाकरी	१२३
३	तांदूळाची भाकरी व भात	१२४
४	गहू पोळी व चपाती	५४
५	भाजी	१०२
६	दूध	७१
७	मांस, मासे	५८
८	अंडी	६२
९	इतर	१४

वरील आकडेवारीवरून आपल्या असे लक्षात येते की अन्नधान्यांमध्ये बाजरीची भाकरी आणि गव्हाची चपाती यांचा जास्त वापर केला जातो. तसेच तांदळाचाही आहारात वापर करणारी बरीच कुटुंबे आहेत. ज्वारीची भाकरी खाणारी केवळ ९१ कुटुंबे आहेत. सण समारंभाच्या दिवशी पुरणपोळी आणि पुऱ्यांचा आहार घेतला जातो. भाजीसाठी स्वत:च्या शेतात पिकलेल्या भाजीपाल्याचा उपयोग मोठया प्रमाणात केला जातो. भाजीपाल्याची जवळ जवळ सर्व प्रकार बुरसेवाडी केले जातात.

५.१४ राहणीमानाचा दर्जा —

राहणीमानाचा दर्जा हा व्यक्ती दैनंदिन जीवनामध्ये वापरत असलेल्या वस्तूंच्या उपलब्धतेवरून मोजला जातो. बुरसेवाडी गावामधील सर्वेक्षण केलेल्या एकूण १३६ कुटुंबापैकी किती कुटुंबांकडे दैनंदिन वापराची कोणती साधने उपलब्ध आहेत त्याचे सर्वेक्षण केले. त्यावरून पुढील माहिती उपलब्ध झाली.

५.१५ घरगुती वापरातील वस्तु

राहणीमानाचा दर्जा ठरविण्यासाठी पुढील अभ्यास आवश्यक ठरावा —

तक्ता क्रमांक — १६. बुरसेवाडी — दैनिक वापरातील वस्तूंचे प्रमाण

अ.क्र	दैनंदिन व्यवहारातील वस्तू	वस्तूंची संख्या	अ.क्र	दैनंदिन व्यवहारातील वस्तू	वस्तूंची संख्या
१	सायकल	४७	२	टेबल	३६
३	फटफटी	५७	४	सोफासेट	२५
५	कार	५	६	दिवाण	४३
७	ट्रक	०	८	शोकेस	२१
९	टेम्पो	३	१०	कणीग	२
११	ट्रक्टर	०	१२	खाट	७७
१३	बैलगाडी	११	१४	बाज	५
१५	सी.डी.प्लेअर	३	१६	धुलाई यंत्र	५
१७	मोबाईल	२१८	१८	शिवणयंत्र	१३
१९	टी.व्ही.	८७	२०	इंजिन	६
२१	डिश	६४	२२	मोटर	२१
२३	कॉम्प्यूटर	४	२४	औत	२८
२५	लॅपटॉप	०	२६	ग्रंथ	२७
२७	टेबलेट	०	२८	पेटी	१५
२९	इस्त्री	४२	३०	तिफन	२१
३१	हिटर	११	३२	पाभर	४०
३३	गॅस	५६	३४	मळणीयंत्र	७

वरील सारणीवरून बुरसेवाडी गावातील १३६ कुटुंबातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा लक्षात येतो. १३६ कुटुंबापैकी ५७ कुटुंबांकडे फटफट्या आढळून आल्या. कॉम्प्यूटर केवळ ४ कुटुंबाकडे आढळून आला. १३६ कुटुंबात २१५ मोबाईल आहेत. टी.व्ही. हा फक्त ८७ घरात आढळून आलेला आहे. टेबल ३६ कुटुंबांकडे आहे. कपाट ६९ कुटुंबाकडे आहे. फक्त २७ कुटुंबांकडे ग्रंथ आहेत.

५.१६ इंधन प्रकार —

स्वयंपाक करण्यासाठी इंधनाची गरज असते. अभ्यास केलेली कुटुंबे पुढीलप्रमाणे इंधनाचा वापर केल्याचे दिसून आले आहे. स्वयंपाकासाठी लाकडाचा वापर करणारी १२० कुटुंबे, रॉकेलचा वापर करणारी ३६ कुटुंबे आहेत. घरात गॅस असणारी ६६ कुटुंबे असून त्यापैकी बरीचशी कुटुंबे ही लाकडावरच स्वयंपाक करतात. फक्त २ कुटुंबे अशी आहेत की ती फक्त गोबर गॅसचा वापर करतात. काही कुटुंबे

स्वयंपाक करण्यासाठी जरी गॅसचा वापर करीत असली तरी पाणी तापविण्यासाठी लाकडाचा वापर करतात. कधी कधी लाकूड उपलब्ध नसेल तर शेतातील धान्याच्या धसकटाचाही इंधन म्हणून वापर केला जातो.

५.१७ वाहने —

बुरसेवाडी गावातील सर्वेक्षण केलेल्या १३६ कुटुंबांपैकी पुढील कुटुंबांकडे पुढीलप्रकारची वाहने आहेत.

तक्ता क्रमांक — १७. बुरसेवाडी गावातील वाहनांची संख्या

अ.क्र	वाहनाचा प्रकार	एकूण संख्या
१	सायकल	४७
२	फटफटी	५७
३	कार	५
४	ट्रक	०
५	टेम्पो	३
६.	ट्रक्टर	०
७.	बैलगाडी	११

बुरसेवाडी गावातील सर्वेक्षण केलेल्या १३६ कुटुंबांपैकी ४७ कुटुंबांकडे सायकली आढळून आलेल्या आहेत. मोटार सायकली असणा—या कुटुंबांची संख्या ५७ असून चारचाकी गाडया असणारी ५ कुटुंबे आहेत. बैलगाडी असलेली ११ कुटुंबे आहेत. ग्रामीण भागात पूर्वी बहुसंख्य शेतक—यांकडे बैलगाड्या होत्या मात्र आता त्यांचे प्रमाण लक्षणीयरित्या कमी झालेले आहे हे यांत्रिक प्रगतीचे द्योतक आहे.

———————————————————

प्रकरण सहावे
सांस्कृतिक घटक

सांस्कृतिक घटक हा हा एक व्यापक विषय आहे. यात मानव निर्मित सर्वच घटकांचा समावेष होतो. शेती व्यापार, उद्योग अर्थ, व्यवसाय, वसाहती, खेडी, शहरे, कारखाने, दळणवळण, भाषा, धर्म, रूढी, चालीरीती, परंपरा, जातिप्रथा, केषभूशा, वेशभूशा अषा शेकडो गोष्टींचा समावेश सांस्कृतिक घटकात होतो. यातील काही घटकांचा आपण इतरत्र अभ्यास केलेला असल्याने येथे उरलेल्या फक्त काही घटकांचा अभ्यास करावयाचा आहे.

६.१ सण समारंभ —

महाराश्ट्रात जे सण साजरे होतात ते सर्व बुरसेवाडी या गावातही साजरे केले जातात. चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढी पाडवा हा सण साजरा केला जातो. चैत्र शुद्ध नवमीला राम जन्मोत्सव साजरा करतात. वैषाख शुद्ध तृतियेस अक्षय तृतिया साजरी करतात. ज्येष्ठ पौर्णिमेस स्त्रिया वटसावित्रीची पूजा करतात. आषाढ शुद्ध एकादशीस येथील लोक उपवास करतात. श्रावण पंचमीस नाग पंचमी साजरी करतात. श्रावण पौर्णिमेस बहिणी भावास राख्या बांधतात. श्रावण कृष्ण अष्टमीस कृष्ण जन्मोत्सव करतात. भाद्रपद शुद्ध चतुर्थीपासून चतुर्दशी पर्यंत गावात गणेशोत्सव साजरा केला जातो. भाद्रपद आमावस्येस बैलपोळा हा सण करतात. अष्विन शु. प्रतिपदेपासून नवमी पर्यंत नवरात्रोत्सव करतात. दशमीला विजया दशमी किंवा दसरा साजरा केला जातो. आश्विन वद्य द्वादशी पासून कार्तिक शु. द्वितियेपर्यंत दिपावली हा सण साजरा केला जातो. कार्तिक षु. द्वादशी पासून पौर्णिमेपर्यंत तुळशीचे लग्न लावतात.

मार्गषीर्श शु. षष्ठी चंपाषष्ठी म्हणून साजरी करतात. पौष महिन्यातील जानेवारी १४ किंवा १५ तारखेस मकर संक्रात साजरी करतात. फाल्गुन महिण्याला शिमग्याचा महिना म्हणतात. फाल्गुन पौर्णिमेस होळी आणि वद्य प्रतिपदेस धुलवड किंवा धुलीवंदन करतात. रंगपंचमीपर्यंत रंगांची उधळण केली जाते.

६.२ चालीरीती —

प्रत्येक घरी मुलाचे लग्न झाल्यानंतर खंडोबाचे जागरण आणि देवीचा गोंधळ हे कार्यक्रम करतात. हे जागरण गोंधळ खंडोबाच्या मंदिरात किंवा घरापुढे करतात. तसेच हिंदू धर्मियांची संख्या अधिक असल्याने हिंदू धर्म परंपरेप्रमाणे जे सण समारंभ साजरे

केले जातात. ते सर्व सणसमारंभ बुरसेवाडीत साजरे केले जातात. हिंदू धर्म परंपरेप्रमाणे सोळा संस्कार व त्यासंबधी सर्व व्रत वैकल्यांचेही पालन केले जाते.

६.३ गावची यात्रा —

चैत्र शु. सप्तमीस बुरसेवाडीत कमलादेवीची यात्रा असते. शिवरात्रीस शंभू महादेवाची यात्रा असते. या दिवशी श्री शंभूची बगाड पालखी निघते. शंभू महादेवाची काठी कावड यात्राही असते. याशिवाय गावात वेताळेश्वराचा उत्सव होतो.

६.४ विवाह पद्धती —

महाराष्ट्रातील विवाहाप्रमाणेच बुरसेवाडीतही विवाह संपन्न होतात. विवाहाच्या अगोदर आपल्या जातीतीलच सोयरीक शोधली जाते. त्यांनतर विवाह जमविताना हुंडा आणि विवाह वधूपक्षाने की वरपक्षाने करावयाचा हे ठरविले जाते. हे ठरल्यानंतर गंधाचा कार्यक्रम होता. विवाहाची तारीख ठरवितात. विवाहाच्या दिवशी दुपारी १२.०० वा. साखरपुडा करतात. नंतर हळद लावली जाते. सायंकाळी मंगलाष्टकांच्या गजरात विवाह संपन्न होतो. नंतर सप्तपदी वगैरे उरकून विवाह संपतो.

६.५ वेषभूशा —

बुरसेवाडीमध्ये पारंपारिक आणि आधुनिक अशी दोन्ही प्रकारची वेशभूषा असलेली आढळून येते. सहावारी साडीबरोबरच नववारी साडी नेसणाऱ्या स्त्रियाही आढळून येतात. तसेच पॅट शर्ट बरोबर सदरा आणि धोतर नेसणारेही दिसून येतात. पण आता अलीकडे केवळ वयोवृद्ध माणसेच धोतर आणि फेटे घालताना दिसून येत आहेत. काही दिवसानंतर हे नामशेष होईल. फेटे तर नामशेष होण्याच्या मार्गावरच आहेत. बुरसेवाडीमध्ये वेशभूषेच्या बाबतीत पुढील परिस्थिती आढळून आली.

तक्ता क्रमांक — १८. बुरसेवाडी गावातील वेशभूषा शेकडा प्रमाण

अ.क्र	वस्त्राचा प्रकार	लोकांची संख्या	टक्केवारी
१	नऊवारी साडी	८४	११.२७
२	सहावारी पातळ	१६१	२१.६१
३	पायजमा शर्ट	६१	८.१८
४	सदरा धोतर	३६	४.८३
५	पॅट शर्ट	२८०	३७.५८
६.	पंजाबी ड्रेस	९१	१२.२१
७.	इतर	३२	४.२९
	एकूण	**७४५**	**१००**

वरीलप्रमाणे बुरसेवाडीतील लोकांची वेषभूशा आहे. नऊवारी साडी नसणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण एकूण लोकसंख्येत ११.२७ टक्के आहे. सहावारी पातळ नेसणा—या महिलांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या २१.६१ टक्के आहे. पायजमा आणि शर्ट नेसणा—या लोकांची संख्या एकूण लोकसंख्येच्या ८.१८ टक्के आहे. सदरा आणि धोतर नेसणा—या लोकांचे प्रमाण ४४.८३ अलीकडच्या नवीन पिढीमध्ये पारंपारिक वेशभूषा केली जात नाही. त्यामुळे या पारंपारिक वेषाचे प्रमाण झपाट्याने कमी होत आहे. काही दिवसांनतर ते नष्ट होईल. पॅन्ट शर्ट घालणाऱ्या लोकांचे प्रमाण लक्षणीय असून एकूण लोकसंख्येच्या ३७.५० टक्के एवढे आहे. पंजाबी ड्रेस वापरणा—या लोकांचे प्रमाण १२.२१ टक्के आहे.

———————————————————

प्रकरण सातवे

सेवा सुविधा

महात्मा गांधीजींच्या म्हणण्यानुसार जर देशाचा विकास करावयाचा असेल तर खेडयांचा विकास झाला पाहिज त्यासाठी त्यांनी 'खेडयाकडे चला' असा संदेश सर्व भारतीयांना दिला. देशातील ६५ टक्के लोक हे ग्रामीण भागात राहतात. त्या दृष्टीने भारत सरकारने ग्रामीण भागाल विविध सोई सुविधा पुरविलेल्या आहेत. यामध्ये गाव तेथे रस्ता, शुध्द पाण्यासाठी पेयजल योजना, दूरध्वनी सुविधा, सार्वजनिक वाचनालय, आरोग्य सुविधा, वीज, सांडपाणी व्यवस्था आणि शौचालय सुविधा या सारख्या योजनांचा समावेश होतो. लोकांचे शहरांकडे होणारे स्थलांतर कमी व्हावे यासाठी रोजगार हमी या सारख्या योजना ग्रामीण भागात राबविल्या जातात. बुरसेवाडी ता. खेड जि. पुणे या गावाचे सर्वेक्षण केले असता खालील सेवा सुविधा आढळल्या.

७.१ वाहतूक आणि दळणवळण

बुरसेवाडी हे गाव राजगुरूनगर शहरापासून २२ किमी अंतरावर वायव्येस चास मार्गे वाडा रस्त्यावर वसलेले आहे. बुरसेवाडी गावठाण राजगुरूनगर ते वाडा या रस्त्यांना जोडणारा रस्ता हा पक्का डांबरीकरण झालेला आहे. रस्त्याद्वारे गावाला सहज पोहचता येते. राजगुरूनगर ते वाडा, राजगुरूनगर ते डेहणे, राजगुरूनगर ते भोगगिरी ही राज्य परिवहन बस वाहतुक नियमित एक तासाच्या अंतराने चालू असते. तसेच इतर खाजगी वाहनांची वारंवारीताही उत्तम प्रकारची आहे.

७.२ पाणी पुरवठा –

बुरसेवाडी गावाला पिण्यासाठी पाण्याचा पुरवठा कोठून होतो याचा षोध घेतला असता असू दिसून आले की सुमारे ३२ कुटुंबे पिण्यासाठी विहिरीचा वापर करतात. नळापासून ५९ कुटुंबे पाणी आणतात. नदीचे पाणी ३ कुटुंबे वापरतात. बोअरवेलपासून ४७ कुटुंबांना पिण्यासाठी पाणीपुरवठा होतो. ५ कुटुंबे तलावाचा पाण्यासाठी वापर करतात. अंतराचा विचार करता ७४ कुटुंबांना १०० मीटर अंतरावरून पाणी आणावे लागते. २५ कुटुंबांना २०० मी. अंतरावर जावे लागते. ६ कुटुंबे पाण्यासाठी ३०० मीटर अंतरावर जातात. ५०० मीटर अंतरावरून १८ कुटुंबे पाणी आणतात. तर सुमारे ९ कुटुंबांना १ कि.मी. अंतरावरून पाणी आणावे लागते. ५ कुटुंबांना १ कि.मी.पेक्षा जास्त अंतरावरून पाणी आणावे लागते.

७.३ वीज

बुरसेवाडी गाव सर्वेक्षणाचा अभ्यास केलेल्या १३६ कुटुंबापैकी ११० कुटुंबांकडे घरात वीज कनेक्शन आढळून आले आहे. तर २६ कुटुंबाकडे वीज कनेक्शन नाही.

७.४ आरोग्य

बुरसेवाडीमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. तेथे गरजूंना मोफत औषधोपचार केला जातो. प्राथमिक आरोग्य केंद्रात महिला प्रसुतीची सोय आहे. गरजू आणि गरीब महिला येथे प्रसूत होतात. त्यांनी तेथील डॉक्टर्स आणि नर्स देखभाल करतात.

७.५ शौचालये

निमगावामध्ये ९२ टक्के लोकांकडे स्वत:ची शौचालये आहेत. ८ टक्के लोक सार्वजनिक शौचालयाचा वापर करतात. गाव १०० टक्के हागणदारी मुक्त आहे. गावाला निर्मल ग्राम पुरस्कार मिळालेला आहे.

७.६ शैक्षणिक सुविधा

बुरसेवाडीमध्ये पहिली ते सातवीपर्यंत जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा आहे. ठाकरवाडीमध्ये चौथीपर्यंत शाळा आहे.

———————————————————————

निष्कर्ष

१. बुरसेवाडीच्या उत्तरेस डोंगराळ प्रदेश असून त्याचा उतार दक्षिणेकडे आहे.

२. बुरसेवाडीच्या दक्षिण हद्दीतून भीमा नदीवरील चासकमान धरण असून तिला उत्तरेडून वाहत आलेले शंभूचा ओढा आणि वेहळदऱ्याचा ओढा हे प्रवाह मिळतात.

३. बुरसेवाडीच्या उत्तरेडील मृदा मुरमाड असून दक्षिणेकडील नदीकाठची मृदा काळी कसदार आहे.

४. बुरसेवाडीचे हवामान मोसमी असून येथे सरासरी १०७ से.मी. पाऊस पडतो.

५. बुरसेवाडी परिसरात उष्ण कटिबंधीय पानझडी वृक्ष आढळतात.

६. बुरसेवाडी परिसरात विविध प्रकारचे पशुपक्षी आढळतात.

७. बुरसेवाडीमध्ये हिंदूधर्मीय लोकांची संख्या खूपच असून बौद्ध लोकांची संख्या कमी आहे.

८. निमगावचे लिंग गुणोत्तर १००० : ९८६ असे आहे.

९. बुरसेवाडीमध्ये तरूणांची संख्या अधिक असून बालकांचे व वृद्धांचे प्रमाण कमी आहे.

१०. बुरसेवाडीमध्ये विवाहित लोकांची संख्या अविवाहित लोकांपेक्षा अधिक आहे.

११. बुरसेवाडीमध्ये साक्षर लोकांची संख्या निरक्षर लोकांपेक्षा कमी असलीतरी पदवीधर आणि पदव्युत्तर लोकांचे प्रमाण फारच कमी आहे.

१२. बुरसेवाडीतून मधून फारच काही लोकांनी इतरत्र स्थलांतर केलेले आहे.

१३. बुरसेवाडीमध्ये सर्वात जास्त म्हणजे ४१ टक्के लोक शेती करतात.

१४. बुरसेवाडीमध्ये सर्वात जास्त ज्वारी अन्नधान्याचे उत्पादन घेतले जाते

१५. बुरसेवाडीमध्ये सर्वात जास्त जलसिंचन नदी आणि विहीरीच्या माध्यमातून होते.

१६. बुरसेवाडीमध्ये २०००० ते ५०००० या वार्षिक उत्पन्नगटात सर्वात अधिक लोक आहेत.

१७. बुरसेवाडीत जिरायत क्षेत्र बागायतपेक्षा जास्त आहे.

१८. बुरसेवाडीत सिमेंटने बांधलेल्या भितींच्या आणि पत्र्याचे छप्पर असणाऱ्या घरांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

१९. अन्नधान्यांमध्ये बाजरीची भाकरी आणि गव्हाची चपाती यांचा जास्त वापर केला जातो.

२०. घरात गॅस असूनही इंधनासाठी लाकडाचा वापर करणारे लोक जास्त आहेत.

२१. बुरसेवाडीमध्ये हिंदूधर्म पद्धतीने अनेक सण समारंभ साजरे होतात.

२२. बुरसेवाडीमध्ये पुरूषांमध्ये शर्ट आणि पॅट घालणा—या लोकांचे प्रमाण अधिक असून स्त्रियांमध्ये साडी घालणा—या महिलांचे प्रमाण अधिक आहे.

२३. बुरसेवाडीमध्ये ५९ कुटुंबांना नळापासून पाणी पुरवठा होतो.

२४. बुरसेवाडीमध्ये दहावीपर्यंत मराठी माध्यमाची शाळा आहे.

२५. बुरसेवाडीमध्ये रस्ते, दवाखाने, वीज यांच्या सुविधा आहेत.

अभाव / समस्या

१. बुरसेवाडीत मुख्य रस्ता पक्का आणि डांबरी असला तरी वाड्यावस्त्यांवर जाणारे रस्ते कच्चे आहेत.

२. बुरसेवाडीमध्ये सर्व सोयींनी युक्त असे मोठे दवाखाने नाहीत.

३. मराठी माध्यमाची शाळा फक्त दहावीपर्यंत आहे. इंग्रजी माध्यमाची शाळा नाही.

४. बुरसेवाडीत वाड्यावस्त्यांवरील काही थोड्या लोकांकडे शौचालये नाहीत.

५. वाड्या वस्त्यांवरील ब—याच लोकांना पिण्याचे पाणी दूरवरून आणावे लागते.

६. ठाकरवाड्यामध्ये रस्ते, पिण्याचे पाणी, इ.सुविधांचा अभाव आहे.

संदर्भ ग्रंथ—

1. Chandana, R.C. Sidhu, M.S. (1980); Introduction to Population Geography, Kalyani Publication, New Delhi.

2. Trewartha, G.T. (1969); A Geography of Population, Jones Wiley, New York.

3. Sawant, S.B. Population Geography, Pune.

गाव येथील निवडक छायाचित्रे

फोटो क्रमांक १. — बुरसेवाडी — विहगंम दृश्य (शंभूच्या टेकडीवरून)

फोटो क्रमांक २. — बुरसेवाडी — शंभूच्या टेकडीवरील मंदिराचे प्रवेशद्वार

फोटो क्रमांक ३. — बुरसेवाडी — गाळपेर जमिन व धरण जलाशय

फोटो क्रमांक ४. — बुरसेवाडी — डोंगरवस्तीकडे जाणारा रस्ता

फोटो क्रमांक ५. — बुरसेवाडी — ठाकर अदिवासी कन्या शेळया घेऊन

फोटो क्रमांक ६. — बुरसेवाडी — कच्च्या विटा तयार करताना अदिवासी तरूण

फोटो क्रमांक ७. — बुरसेवाडी — पारंपारीक जळण गोवऱ्या

फोटो क्रमांक ८. — बुरसेवाडी — बागायती शेती कांदा पीक

फोटो क्रमांक ९. — बुरसेवाडी — चासकमान धरणाचा जलाशय

फोटो क्रमांक १०. — बुरसेवाडी — डोंगरउतारावरील वनव्यवस्थापन

फोटो क्रमांक ११. — बुरसेवाडी — घर

फोटो क्रमांक १२. — बुरसेवाडी — जिरायती क्षेत्र असलेली जमिन

फोटो क्रमांक १३. — बुरसेवाडी — पाणंद रस्ता

फोटो क्रमांक १४. — बुरसेवाडी — अदिवासी ठाकर समाजाची वस्ती

फोटो क्रमांक १५. — बुरसेवाडी — जुन्या पध्दतीचे बांधकाम असलेली घरे

फोटो क्र. — १६ बुररसेवाडी — पारंपारीक पध्दतीने जनावरांचे व्यवस्थापन

फोटो क्रमांक १७. — बुरसेवाडी — बागायती क्षेत्र समिंश्र पिके

फोटो क्र १८ — शंभू मंदिर येथे एस.वाय.बी.ए. विद्यार्थ्यांसमवेत प्रा.डी.एम.मारकड